नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

जुलै १९६०

युगवाणी

या अंकातील लेखक व कवि

वसंत वि. साखरकर
रामदास सेलूकर
दत्तु गोरे
सौ. उषा लिमये
मनोहर अपोनारायण
डॉ. द. ह. अग्निहोत्री
के. स. पाटणकर
ना. रा. शेंडे
बाबा मोहोड
प्रा. इ. जी. माने
स. शं. देसाई
नी. र. वऱ्हाडपांडे

मूल्य ५० नये पैसे

अनुक्रमणिका

(मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयाकरिता मान्य झालेले)

युगवाणी

जुलै १९६०

संपादक–मंडळ
संपादक पु. य. देशपांडे
सदस्य : प्र. वा. ऊर्ध्वरेषे
पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

(मुद्रणाच्या काही अपरिहार्य कारणामुळे या अंकास विलंब लागला याबद्दल आम्ही दिलगीर आहोत)

★ ★ ★

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
संपादक
पुरुषोत्तम यशवंत देशपांडे
युगवाणी
वर्ष १५] [अंक ४
कला : जीवन : समीक्षा : संस्कृति
जुलै १९६०

कविता

आगमन :

वसंत वि. साखरकर

तुझे आगमन होवो
मधुरशा चांदराती
आकाराया प्रतिज्योति !

विचारांच्या कुसुमांची
सुगंधित माला उरी
विसराया दु:खे सारी !

पाणीदार डोळ्यातले
नाही फेकणार तेज
नाही जाळणार तुज !

चित्त एकाग्र होऊ दे
जांभळीच्या मांडवात
मोहोरल्या यौवनात

भाग्यरेषा उजाळता
नको खेळू लंपडाव
बुडेल ग, ध्येय–नाव !!

★ ★

अनुक्रमणिका

अंत

रामदास सेलूकर

कधी होईल अंत...
कधी होईल अंत...
वेदनांचा साऱ्या
सद्‌भावांच्या केव्हाच
उडाल्या ठिकऱ्या. ठिकऱ्या !

मृदु नाजुक भावनांचा
कधी होईल शेवट
वासना घेती मनात
गगन व्यापी पेट. !

कधी जळतील हे
किनारलेले रंग-मेघ !
ये ! लाल रंगात भिनवू
तुझे-माझे रक्त-ओघ !

★ ★

ईश्वरकरणी

दत्तु गोरे

असंभवातिल मेघ पांढरा
अवचित करतो वृष्टि धरेवर,
काळा फत्तर दर्याद्र होऊन,
तृण--पर्णांचे प्रसवे अंकुर !
असंभवाला संभवातही–
वांझपणी मग गर्भ राहिला
शतपुत्रांच्या गांधारीनें
वृथा कुलक्षय असाच केला !
असंभवाला अघटित होते,
तेहि न कळते भगवंताला.
अघटित गोष्टी, चमत्कृतीं त्या,
'ईश्वरकरणी' लोकां दिसल्या!

★ ★

अनुक्रमणिका

कारावास

सौ. उषा लिमये

जाशील तू कुठे । विठाई माऊली
नेत्री साठवीली । मूर्ती तुझी ॥१

भक्तीचा कृपेशी । जाहला करार
आता नाही द्वार । पळावया ॥२

नाव सुद्धा तुझे । आमुच्या मुखात
सर्वस्व पणात । हरलास ॥३

भोळा भाव माझा । कृपेला कारक
लोहास चुंबक । ओढी जसा ॥४

जिथे माझा माथा । भक्तीने टेकीन
तेथेच चरण । हवे तुझे ॥५

श्रद्धेच्या श्वासाला । तुझा एक ध्यास
प्रकाशे सूर्यास । जिंकीयले ॥६॥

कटीवरी कर । विटेसी चरण
हेच हवे ध्यान । डोळयापुढे ॥७॥

चुरीन चरण । करीन चाकरी
जायचे न दुरी । परी तुवा ॥८॥

केल्या आणा भाका । जोडलेस नाते
काळहि न त्याते । तोडु शकै ॥९॥

आता या भक्तीचे । जडले व्यसन
खोड मेल्यावीण । सुटते कां ? ॥१०॥

अंतरात वास । अधरात ध्यास
हाच कारावास । आता तुला ॥११॥

★ ★

वेणा

मनोहर अग्नीनारायण

काजळत्या रात्रीला
वेड नित्य जळण्याचे
होणाऱ्या वेणांना
स्वप्न जुने जपण्याचे

जपणाऱ्या मायेला
जाण असे 'कलिजा' ची
उवलेल्या स्वप्नांना
भीत असे सरण्याची

सरणाऱ्या स्वप्नांना
आयु असे अल्प किती ?
उरलेल्या काळाची
राहि पुन्हा कूस रिती

रडणाऱ्या--देवकीला
कूस म्हणे रिक्त मूक
अष्टमीला येणाऱ्या
विश्वाची हाक अैक

★★★

बोलभाषांचे व्युत्पत्तिशास्त्र

लेखक– डॉ. द. ह. अग्निहोत्री

मुखनिर्मित ज्या शब्दांच्या द्वारे मनुष्य आपले विचार किंवा भाव व्यक्त करतो त्या शब्दांना भाषा म्हणतात. भाषा हा शब्द मूळ संस्कृत आहे. त्याचाच मराठी प्रतिशब्द बोली असा आहे. आरंभी कित्येक शतके मनुष्याने आपले विचार भाषेच्या किंवा बोलीच्या द्वारेच व्यक्त केले असतील. तेव्हा सर्वच बोली किंवा भाषा असाव्या. बोल-भाषा असा शब्दप्रयोगहि तेव्हा अस्तित्वात नसावा. कोणत्यातरी एका बोलीत साहित्य–निर्मिति झाली. ती शिष्ट भाषा ठरली व तदितर ज्या बोली त्या बोलभाषा ठरल्या. यावरून साहित्यनिर्मितीमुळेच कोणतीहि बोली शिष्ट–भाषा ठरते हे उघड आहे.

एकाच भाषेच्या पोटभाषात किंवा बोलभाषात फरक आढळतो. त्याचे कारण येथे देणे आवश्यक आहे. सर्वांची स्वरयंत्रे सारखी विकसित नसल्यामुळे, मुख विवर म्हणजे मुखाच्या आतील भाग व जीभ यातहि अल्पस्वल्प फरक असल्यामुळे सर्वांचे वर्णोच्चार कमी अधिक भिन्न असतात. ज्या दोन प्रदेशामध्ये मोठ्या नद्या, पर्वत, किंवा अरण्ये असत त्यांच्यात प्राचीन काळीं दळणवळण फारच कमी असे. एकच भाषा बोलणारा मानव–समाज काही कारणांनी विभागला जाऊन या प्रदेशात राहू लागला तर कालान्तराने एकाच समाजाच्या या दोन शाखांच्या बोलभाषात फरक होत जातो.

मूळ उच्चार बदलण्याची मुख्य कारणे पुढील प्रमाणे असतात. पहिले कारण: स्वरयंत्राच्या विकासाची भिन्नता; दुसरे: भिन्न हवामान; तिसरे: प्रयत्न लाघवाचे व्यक्तिगत अनेक प्रकार; चौथे कारण: भिन्न वेशीय व भाषा–भाषी मानवसमाजाचा संपर्क; पाचवे: शब्दोच्चार ऐकणे व त्याचे अनुकरण करणे यात स्वभाव दोषामुळे होणारा निष्काळजीपणा; किंवा सहावे: व्यवसाय भिन्नता. आपल्या भारतातील बोलभाषाभेदाला वरील सर्व कारणांनी थोडा बहुत हात-भार लावला आहे.

भारतात आर्यवंशीय लोक आले ते टोळ्याटोळ्यांनी व अनेक शतकांच्या अंतराने आले. त्यांतील काही ‘य्’ या वर्णाचा उच्चार ‘ज’ करीत. कोणी ‘ष’ ऐवजी ‘ख’ च उच्चारीत, तर कोणाला ‘ळ’ चा उच्चार न जमल्यामुळे

ते 'ड' असा उच्चार करीत. ह्या सर्व टोळचात प्रतिभावान् लोक जन्मले. त्यांनी विचार-परिप्लुत व भावनात्मक साहित्य निर्माण केले. ते ज्या बोलीत निर्माण झाले ती शिष्ट किंवा प्रतिष्ठित भाषा ठरून इतर वर सांगितल्याप्रमाणे बोल-भाषा ठरल्या. वेदांची संस्कृत भाषा ही तत्कालीन आर्यांची प्रतिष्ठित भाषा आहे. आपण तिला आज "वैदिक-संस्कृत" म्हणतो. तत्कालीन प्राकृता वा बोल-भाषांचा नमुना आज उपलब्ध नाही. कारण वैदिक ऋचांचे पाठान्तर करून लोकांनी जतन केले, रोजच्या व्यवहारांतील साध्या गोष्टीचे असे जतन कोणी केले नाही. कारण त्या कमी महत्वाच्या होत्या. काही बोलभाषांत ओझरते अनुस्वार किंवा सानुनासिक स्वर होते, पण कित्येक भाषाशास्त्रज्ञांचे असे मत आहे की वेदकाली सामान्य जनांची एखादी प्राकृतभाषा किंवा बोलभाषा असावी. कदाचित् बौद्ध ग्रंथातील पाली सारखीच ती असेल असेहि काहींचे म्हणणे आहे. कित्येक शतकानंतर गौतम बुद्धाने पाली भाषेत आपल्या नव्या धर्ममताचा प्रचार केला त्याच्या शिष्यांनी ती सामान्य जनांची भाषा—समजण्यास सोपी—म्हणून त्या भाषेत बौद्ध धर्मग्रंथ लिहिले व तेव्हापासून ती बोलभाषा शिष्ट भाषा झाली.

ज्या काली पाणिनीय संस्कृत-भाषा प्रतिष्ठितांची व साहित्याची भाषा होती, त्या काली भारताच्या वेगवेगळचा भागांत वेगवेगळचा प्राकृत भाषा—सामान्य जनांच्या बोलभाषा होत्या. पैशाची, मागधी अर्धमागधी, शौरसेनी व महाराष्ट्री ही त्यांची नावे होत. या भाषा बोलणाऱ्या आर्यांचे पूर्वज भारतात आले ते प्रथम सिंधू, व तिच्या पाच उपनद्या व गंगा यमुना यांच्या काठच्या प्रदेशात, म्हणजे उत्तर भारतात राहू लागले. अनेक शतकांनी ते विंध्य व सातपुडा पर्वत ओलांडून दक्षिणेत आले. त्यांची पहिली टोळी सह्याद्रीच्या पश्चिमेस म्हणजे कोकण पट्टीत जाऊन वसली. त्या नंतर काही शतकांनी दक्षिणेकडे आलेले आर्य सह्याद्रीच्या पूर्वेस असलेल्या दक्षिणापथाच्या वेगवेगळचा भागात येऊन वसले. ते उत्तरेकडील वेगवेगळचा भागातून आले होते. व वेगवेगळचा काळी आले होते. कोणी पैशाची, तर कोणी मागधी, कोणी अर्धमागधी तर कोण शौरसेनी, कोणी महाराष्ट्री तर कोणी महाराष्ट्री अपभ्रंश बोलभाषा बोलणाऱ्यांचे वंशज होते. त्यांच्या बोलभाषांच्या मिश्रणाने आपली मराठी बनली, म्हणून मराठीत कित्येक शब्दांत मूळ 'ण' चा 'न' करण्याची पैशाचीची प्रवृत्तिहि आहे. तशीच श चा स करण्याची लकबहि आहे. पालीतील 'ळ' देखील मराठीत आढळतो. पण नाम व आख्यात प्रत्यय महाराष्ट्री अपभ्रंशाचे अवशेष आहेत.

इ. स. पूर्व ३०० ते इ. स. ५०० पर्यन्तच्या काळात वर उल्लेखिलेल्या सर्व प्राकृतातून साहित्यनिर्मिति झाली व त्या प्रतिष्ठित किंवा शिष्ट भाषा ठरल्या होत्या—त्या सर्वात महाराष्ट्रीचे स्थान फार मानाचे होते. तिच्यात विपुल रचना

अनुक्रमणिका

झाली. आचार्य दंडीने आपल्या ग्रंथात तिचे वर्णन " महाराष्ट्राश्रयांभाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः। " असे केले आहे. या महाराष्ट्रीची व तिच्या अपभ्रंशाची छाप मराठीवर फार आहे. या सर्व भाषांच्या मिश्रणाने तयार झालेली प्राचीन मराठी आरंभी बोलभाषा होती. तेव्हा संस्कृत व प्राकृत याच शिष्ट भाषा होत्या.

या बोल भाषा असलेल्या मराठीला यादवकाली राजाश्रय मिळाला. तेव्हा कालौघात भाषेत फरक पडत गेला. त्यामुळे मूळ संस्कृत धर्मग्रंथ सामान्यजनांना समजेनातसे झाले, म्हणून निवृत्ति-ज्ञानदेवांनी आपले ग्रंथ तत्कालीन प्राकृत जनांच्या भाषेत म्हणजे मराठीत लिहिले. चक्रधराने व त्याच्या अनुयायांनी आपल्या पंथाच्या तत्वज्ञानाचा प्रचार करण्यासाठी मराठीचीच निवड केली. तेव्हा मराठी बोलीला-(मराठीच्या विशिष्ठ बोलभाषेला) प्रतिष्ठित भाषेचे गौरवाचे स्थान मिळाले.

एकच मराठी भाषा बोलणाऱ्यात सुद्धा थोडी बहुत उच्चारभिन्नता असतेच. बारा कोसांवर भाषा बदलते म्हणतात ते याच अर्थाने. तशा मराठी भाषिकांच्या सुद्धा विभाग भिन्नतेप्रमाणे वेगवेगळया बोलभाषा आहेतच; त्यात कोंकणी व वऱ्हाडी ह्या ज्येष्ठ भगिनी होत. यात यादवकालीन ग्रंथातील कित्येक जुने शब्द रूढ आहेत, जे शिष्ट मराठींत आढळत नाहीत. या दोन मुख्य बोलभाषाशिवाय प्रांतपरत्वे व जातिपरत्वे भिन्न बोलभाषा आहेतच. त्या मुख्यतः वर्णोच्चारांच्या लकबी, व थोडयाप्रमाणात नाम व आख्यात प्रत्यय-भिन्नता यामुळे मानण्यात येतात. त्या बद्दल माहिती संक्षेपाने पुढे दिली आहे.

कोंकणप्रांत समुद्र किनाऱ्यालगंत आहे. कित्येक शास्त्रज्ञांचे मत असे आहे की समुद्र किनाऱ्यालगत राहणारे लोक वर्णोच्चार थोडे नाकातून करतात म्हणजे त्यांचे स्वरोच्चार सानुनासिक असतात. हा भौगोलिक परिस्थितीचा परिणाम कोंकणस्थांच्या बोलभाषावर झालेला आढळतो. त्यांच्या बोलभाषात व्युत्पत्तिसिद्ध अनुस्वार तर आहेतच, पण त्याशिवाय अकारण अस्पष्टोच्चारित अनुस्वारहि आहेत. त्यापैकी व्युत्पत्तिसिद्ध जसे, कांटा, लोंकर, सांपडणे, दांत, इ. हे शब्द कण्टक, लोम, संप्राप्त, दन्त या शब्दापासून निघाले आहेत. या शब्दाच्या बाबतीत मूळ संस्कृत शब्दातहि नासिक्य वर्ण आहे. म्हणून त्यावरील अनुस्वार व्युत्पत्तिसिद्ध आहे हे निर्विवाद आहे.

ताक, भात, काकडी, कोंपर ह्या शब्दांच्या प्राकृत रूपांत (तक्क, भत्त, कक्कडी, कुप्पर,) यात द्वित्त व्यंजने होती व त्यामागील स्वर ऱ्हस्व होते. हे शब्द मराठीत येताना द्वित्त व्यंजनांची एकेरी व्यंजने झाली व मागील स्वर दीर्घ झाले.

अनुक्रमणिका

अशा वेळी मागील स्वराचा उच्चार मराठीच्या काही बोलभाषात सानुनासिक करण्याची लकब आहे, असे समर्थन करता येणे शक्य आहे. पण ज्यांचे समर्थन भौगोलिक परिस्थिती शिवाय दुसऱ्या कोणत्याच सबबीवर करता येणार नाही असे अकारण आलेले अस्पष्टोच्चारित अनुस्वार आहेत; जसे. केंस, लांकूड, हंसणें, कांच. इ.

कोंकणी मराठीत शद्बातील अन्त्य 'आ' काराऐवजी बहुधा सर्वत्र 'ओ' कार आढळतो. उ. घोडो, भोपळो, पायल्यो, मोठचो, सगळयो, शहाणो, ह्यो, त्यो, चो, सगळो, वरो, जागो, केलो, हवो, प्रजेचो आवाज. इ. ही लकब महाराष्ट्री अपभ्रंशाचा अवशेष आहे.

ग्रांथिक अथवा शिष्ट मराठीतील खणखणित अनुस्वाराऐवजी अनुस्वारामागे दीर्घ स्वर असता कोकणात ओझरता अनुस्वारोच्चार करतात. उ– मांजर, तांदूळ, फांदी, लांब, खोंड, बेंड, गांजणें, तोंड, कांड, यांऐवजी माँजर, ताँदूळ फाँदी, लाँब, खोँड, बेँड, गाँजणें, तोँड, काँड, असे उच्चार कोकणांत होतात. ही लकब सागरकडील मराठी भाषिकात आहे.

कोंकणातील कोळी लोक शद्बातील 'र' व 'ल' बद्दल 'न' वर्ण उच्चारतात. त्यामुळे, लागला बद्दल नागला, लांब बद्दल नांब, रोटी बद्दल नोटी असे शद्ब त्यांच्या तोंडून ऐकू येतात.

कोंकणी बोलभाषेचे अनेक पोट-भेद आहेत पण सानुनासिक स्वरोच्चार हे त्यासर्वांचे वैशिष्ठ्य आहे.

दन्ततालव्य वर्णोच्चारात कोंकणातील एक पाऊल पुढेच आहेत म्हणून त्यांच्या बोलण्यात जेथे, जेवढे, जेवण, चेचणें, जनुभाऊ, राजेलोक असे शद्बोच्चार होतात.

नपुसकलिंगी शद्बांच्या रूपांतील एँ ऐवजी आँ आणण्याच्या त्यांच्या लकबी मुळे, डुकराँ, फुलाँ, केळाँ, भांडाँ, असे विचित्र शद्ब आपल्या कानावर पडतात.

तिकडील लोक भूतकाळी क्रियारूपांना त्यांच्या बोलीत 'न्' लावतात; उ. मो किंवा म्या केलेंन्, सांगितलेंन, धाडिलेंन् इ.

वऱ्हाडी बोलभाषेला अनुस्वारांचे वावडे आहे. व्युत्पत्तीने सिद्ध अनुस्वारहि वऱ्हाडीने झुगारून दिले आहेत; उ. काटा, लोकर, सापडणे, दात इ. ओझरते अनुस्वार वऱ्हाडीत औषधालाहि नाही. जे आहेत ते खणखणित.

अक्षरावरील अनुस्वाराच्या गाठोडयाप्रमाणे, अंत्य व क्वचित उपान्त्य अक्षरातील ए काराची लोंबती तरवारहि वऱ्हाडीने चुकविली आहे. म्हणून फुल, मूळ, गुर, असल, वसल, करल, कोठ, जेथ तेथ इ. वऱ्हाडीत आहेत.

द्वितीया, चतुर्थीच्या ' ला ' (प्रत्ययाला) लांब ठेवून वऱ्हाडीने ' स ' ला संनिध व ' ज ' ला जवळ केलेले आढळते. उ. मस, मज, तूस तूज त्यास, रामास, म्हणून गावास, इ. ग्रामीण भाषेत ' ला ' च्या कान्हयाला धाब्यावर बसवून दिले, मले, तुले, हे शद्ब कानी येतात.

वऱ्हाडीच्या पोटभेदात शद्बातील ' इ ' ' व ए ' चे उच्चार भिन्न भिन्न प्रकारे होतात. उ :– देल्लं, घेल्लं, राह्यल, त्यव्हा, राहल, पाहल इ.

शद्बारंभीच्या ' ए ' बद्दल ' ये ' व ' ओ ' बद्दल ' व ' वऱ्हाडीत होतो. उ येक, येवढा, येरीच, वटा, वसरी, वघळ, वकला, इ.

वऱ्हाडातील ग्रामीण बोलीत अव व आव यांचा ' ओ ' होतो. उदाहरणार्थ जोळ (जवळ), सोत्त (सवत), उडोला (उडवला) इ.

वऱ्हाडच्या पश्चिम भागात ' ळ ' बद्दल ' य ' येतो तर पूर्व भागात ' ळ ' ' र ' रूपाने प्रकट होतो. एका भागातील लोक, 'जोय', 'डोया', 'शायेत' 'काया', म्हणतील तर दुसऱ्या भागातील 'जोर', 'डोरा', 'शारेत' 'कारा',

नागपूरकडे 'ण' ऐवजी 'न' उच्चारतात उ. 'कोणी पानी आनले'.

शिष्ट मराठींत अनेक वचनी सामान्य रूपात अनुस्वार आहे. वऱ्हाडी त्या ऐवजी 'ही' किंवा 'ई' योजिते. बापाहीस, बापाईस, त्याहीचा इ.

दर्शक सर्वनामे ह्या, जो, तो, थो, पुंल्लिगी व हे, जे, ते स्त्रीलिंगी. पुरुष-वाचक सर्वनामांची रूपे तृतीया, त्वा, त्या, प्रथमा तो, थो, इ.

क्रियापदाच्या वर्तमान काळी द्वितीय व तृतीय पुरुषी रूपात पुरुषभेद किंवा लिंगभेद आढळत नाही. तू येते, तो येते, ते येते इ.

वर्तमानकाळी मी आहो व रीतिवर्तमानाचा मी असो, निजो, इ. रूपे इतर मराठी भागातील लोकांना चमत्कारिक वाटतात.

संबोधनार्थक अव्यये, पुरुषासाठी अगा, कागा, व स्त्रियासाठी अव, काव. विच्छा, विंदूर यात व्यर्थच 'व' येतो. तर इचार, इस्तो, इलक्षण यातील 'व' व्यर्थच वगळला जातो. हे बोलभाषांच्या लहरीचे किंवा कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् सामर्थ्याचे उदाहरण होय.

भंडाऱ्याकडील ग्रामीण बोलीत 'म' व 'न' यांच्या सान्निध्याने शब्दात अनुस्वार येतात. उ. नांग, नंगर, निंजली, निंघाली, मांगे, मांगितले, मंगरान भन्नारा इ. तिकडील ग्रामीणांना दंततालव्य उच्चार साधत नाहीत. हिंदी भाषिकांच्या सान्निध्याचा प्रभाव असावा.

खान्देशींत एका विशिष्ट समाजाच्या बोलीत 'ळ' ऐवजी 'ड' येतो. उ. जडगायी गेल्तो तठी नडच नड, अडत नाहीच, गूड दाडचा खाल्या अन् जपी गेलो. खान्देशीत पूर्वकालवाचक अव्यये 'इ' लागून होतात. घी घे, करीटाक, करीसन, बोली घे. गुजरातीच्या सान्निध्याचा परिणाम असावा.

ग्रांथिक मराठीत व मराठीच्या वेगवेगळचा ग्रामीण भाषात महाप्राण वर्णोच्चारांची बचत किंवा ओढाताण झालेली आढळते. उ. हिंदी व गुजरातीत, भीख, भूख, हाथ, धन्धा यांऐवजी मराठीत भीक, भूक, हात, धंदा इ. महाप्राणांची खैरात मराठीला मान्य नाही. मराठवाडचातील दखन्यांच्या बोलीतील महाप्राण वर्णांच्या बाबतीतील चिक्कूपणा एक पाऊल पुढे गेला आहे. बगकी तो दूद पिऊन निगाला दिकील. हा द्राविड भाषिकांच्या सान्निध्याचा परिणाम.

या शिवाय ग्रामीणांनी केलेली ओढाताण पाहा. वऱ्हाडखान्देशात वहड पहड, चहड, वहाग, किंवा, म्होतूर, म्होर, म्हार, ऱ्हायल, न्हाई, न्हव, धई. सातान्याकडे हितं, फुडं, फुना, फावल (पहावलं) इ. भिन्न बोलभाषात आघात व हेल हेहि भिन्न असतात. पण ते गौण म्हणून त्यांची चर्चा येथे केलेली नाही.

एखादी बोली बोलणाऱ्या लोकात अनेक विचारवन्त व प्रतिभासंपन्न लोक जन्मून त्यांनी महत्त्वाचे व लोकप्रिय साहित्य निर्माण केले की तिला शिष्ट, भाषेचें स्थान मिळते. पुढे व्युत्पन्न व व्यासंगी लोक तिच्यावर संस्कार करून तिला प्रौढ बनवितात. व त्या भाषेच्या संपूर्ण क्षेत्रातील शिष्ट लोक तिची सेवा करू लागतात. हल्लीची ग्रांथिक मराठी अशीच तयार झाली आहे. पण आता मात्र बोलभाषेला इतक्या सहज रीतीने हे मानाचे स्थान मिळविता येणार नाही. कारण शिक्षणाच्या प्रसाराने, छापण्याच्या सोईने व वाहतुकीच्या आणि दळणवळणाच्या साधनांच्या वाढीमुळे शिष्ट भाषेचेच आसन अधिक स्थिर होत आहे व तिचे क्षेत्र अधिक व्यापक होत आहे. बोलभाषाभाषिकांची संख्या कमी होत जाऊन बोलभाषेचे क्षेत्र आकुंचित होत आहे.

एका दृष्टीने हे हितकरच आहे. कारण त्यामुळें आपल्यातील परकेपणा दुरावून एकत्वाची भावना वाढीस लागेल.

★★★

मराठी लघुलिपी

लेखक– **के. स. पाटणकर**, पी. ए. टू कमिश्नर, नागपूर

कै. श्री. कृ. कोल्हटकर ह्यांच्या 'महाराष्ट्र' गीतातील 'वचनि लेखनींहि मराठी गिरा दिसो' हे स्वप्न पूर्णत्वाला आणण्याच्या दृष्टीने 'महाराष्ट्रा'ने सुरवात केली आहे. व 'महाराष्ट्र' स्थापनेच्या सुमुहूर्तावर सर्वथा मराठी भाषेचा वापर राज्यकारभारात व्हावा ह्या दृष्टीने 'भाषा–विभाग' नावाचा नवीनच विभाग महाराष्ट्र सरकाराने स्थापन केलेला आहे.

भासणारी मुख्य अडचण

सरकारी कामकाजात मराठी भाषेचा वापर करणे इतके अवघड जाणार नाही हे खरे पण त्याचबरोबर कारभारात जलदपणा येण्यास लागणाऱ्या शीघ्र-लेखकांची उणीव असल्यामुळे कामात बरीच शिथिलता येणे स्वाभाविक आहे. तेव्हा अशा स्थितीत शक्य तितक्या लवकर मराठी शीघ्रलेखक कसे तयार करता येतील ह्याकडे त्या त्या विषयाची गोडी असणाऱ्यानी प्रयत्नाला लागणे आवश्यक आहे.

लघुलिपीसाठी झालेले प्रयत्न

मराठी लघुलिपी तयार करण्याच्या दृष्टीने अनेकांनी प्रयत्न केलेले असतील पण ते जोपर्यंत उजेडात येत नाहीत तोपर्यंत त्यात न्यूनता असल्यास ती भरून काढणे कठीण जाईल. तरी ज्या ज्या व्यक्तींनी ह्या प्रयत्नात भाग घेतलेला आहे, त्यांनी लवकरात लवकर ते प्रसिद्ध करून लोकास उपलब्ध करावेत.

ह्याप्रमाणेच माझे व्यवसायात मला जे निरनिराळे अनुभव आले व ह्या विषयाची मला कशी गोडी उत्पन्न झाली, ह्याविषयी थोडक्यात मी लिहिणार आहे. माझा मुख्य व्यवसाय इंग्रजी स्टेनोग्राफर म्हणूनच आहे. व त्याकरिता इंग्रजी-तील सर्वोच्च असलेल्या पिटमन् पद्धतीचा मी उपयोग केला आहे. सन १९३८ पासून १९४७ पर्यंत इंग्रजी स्टेनोग्राफर म्हणून काम केल्यानंतर मला सन १९४७ मध्ये श्री. रा. कृ. पाटील I. C. S. जुन्या मध्यप्रदेशात अन्न मंत्री असतांना त्यांचेजवळ पी. ए. म्हणून काम करण्याची संधी मिळाली व त्या जागेवर मी जवळ जवळ ३-४ वर्षे होतो. त्यांचा परिपाठ असा असावयाचा की त्यांना ज्या भाषेत पत्रे यावयाची

त्याच भाषेत ते उत्तरे पाठवीत असत. सहाजीकच मला ती त्या भाषेत उतरवून घ्यावी लागत असत. प्रथम प्रथम फारच त्रास होऊ लागला. इंग्रजी बरोबरच हिंदी व मराठी लघुलिपीचा वापर करण्यास इंग्रजीसाठी उपयोगात आणलेली पिटमन् पद्धतीच मराठी व हिंदी भाषेत आणणे भाग होते. नाहीतर सर्वत्र घोटाळे झाले असते आणि इंग्रजीत असलेल्या गतीत फरक पडला असता म्हणून मराठी लघुलिपी पिटमन् पद्धतीतील मुख्य पायांवर आधारून लिहिण्यांस सुरवात केली व ३–४ महिन्यातच मी मराठीत उतारे घेऊ शकलो. पण त्या पद्धतीत सुधारणा करणे अवश्य होते कारण निश्चित नियमाचे पालन केल्याने लघुलिपीत गती तर येतेच शिवाय उतारे देवनागरीत उतरवून घेतांना त्रास मुळीच पडत नाही. तेव्हा मी तयार केलेल्या ह्या पद्धतीत पिट्मन् पद्धतीचा चांगलाच पगडा आहे. व त्यातील व्यंजनदर्शक रेषांत फारसा फेरफार केलेला आढळून येणार नाही. व ह्यामुळे आज कित्येक वर्षे पिटमन् पद्धतीने काम करणाऱ्या व्यक्तींच्या परिश्रमाचा फायदा मिळून ४–५ महिन्याच्या अवधीतच मराठी लघुलेखा म्हणून तयार करता येईल व एकाच व्यक्तीला इंग्रजी व मराठी लघुलेखक म्हणून काम करता येईल. सध्या महाराष्ट्रांत अशाच लघुलेखकांची विशेष गरज आहे. कारण इंग्रजीत व मराठीत राज्यकारभार राहणे संभवते. आज जवळ जवळ एक तप ह्यात काढल्यानंतर बरीच सुधारणा करून ते प्रसिद्ध करण्याचे मी धैर्य करीत आहे.

देवनागरी लीपीप्रमाणें व्यंजनदर्शक रेषांची मांडणी

इंग्रजीतील पिटमन् पद्धतीचे बारकाईने निरिक्षण केल्यास असे दिसून येईल की त्यातील व्यंजनांसाठी निर्धारित केलेल्या रेषांची मांडणी देवनागरी लिपीच्या मांडणीप्रमाणेच आहे.

क	–	ग	ह्या जोडीतील पहिले व्यंजन
च	–	ज	कठोर व्यंजन आहे व दुसरे
ट	–	ड	मृदुव्यंजन आहे. कठोर व्यजंना-
त	–	द	करता बारिक रेषा तर
प	–	ब	मृदुव्यंजनाकरता त्याच जोडीतील

व्यंजनासाठी निर्धारित केलेल्या रेषेस जाड लिहिण्यास पिटमन् पद्धतीत सांगितले आहे. ट वर्ग व त वर्ग ह्यातील उच्चारसादृष्यामुळे ट साठी काढावयाची रेषा चंद्राकार करून तिलाच त साठी निर्धारित केली आहे. इंग्रजीत त नसल्यामुळे त्यालाच थ म्हणावयास सांगितले आहे.

देवनागरीतील अनुनासिके ङ, न, म, साठी एकाच प्रकारच्या चंद्राकार रेषेस जाड–बारिक उलटी–सुलटी काढावयांस सांगितले आहे.

आता राहिलेली व्यंजने य, र, ल, व, श, ष, स, ह. (ळ, क्ष, ज्ञ इंग्रजीत नाहीत) ह्यास प्रत्येकी निरनिराळ्या रेषा निर्धारित केल्या आहेत. व त्यातील सकारयुक्त श–ष–स व्यंजनें सोडून बाकीच्या य, र, ल, व आणि ह साठी नैॠत्येकडून ईशान्येकडे तिरपी रेषा काढून तिला प्रथम उलट–सुलट वलये काढावयास सांगितले आहे. त्या ऐवजी तिला चंद्रकार करावयास सांगितले व ह साठी सुरवातीस पोकळ गाठ मारावयास सांगितली. व श–ष–स ह्या सकारयुक्त व्यंजनासाठी, एक चंद्राची रेषा. तात्पर्य य–र–ल–व–श–ष–स–ह ह्या पैकी कोणतेही व्यंजन वरील ५ वर्गापैकी कोठेही देवनागरीत नसल्यामुळे त्यांसाठी निराळ्याच रेषा निर्धारित केलेले आढळून येते.

वरील विवेचनावरून वाचकांस थोडी शंका येण्यास जागा आहे व ती म्हणजे पिटमन् पद्धती ही देवनागरी लिपीच्या मांडणीवर आधारलेली तर लिपी नसावीना. ह्यावर उलट असेही म्हणता येईल की पिटमन्‌ने उच्चाराप्रमाणे शब्द मांडावयास सुरवात केली असेल व ती मांडणी देवनागरी लिपीतील मांडणी—प्रमाणे झाली असावी. पण कठोर व मृदुव्यंजनांची जोडी कशी तयार केली असावी ह्याचा आधार मिळत नाही.

मराठी भाषेची वैशिष्ठ्यें

इंग्रजी भाषेच्या मांडणीपेक्षा मराठी भाषेची मांडणी अगदी भिन्न आहे. इंग्रजी भाषेत विभक्तीप्रत्यये व शब्दयोगी अव्यये मूलशब्दाच्या पूर्वी येतात तर मराठीत त्यामूळशब्दानंतर लगेच लागून येतात. तसेच तिकडे क्रिया विशेषणांत विभक्ती प्रत्यये व शब्दयोगी अव्यये लागतात व ते देखील मूलशब्दाला लागूनच येतात. लघुलेखनाचे मूल तत्व असे आहे की शक्य तितक्या जलद शब्दपंक्ती उतरवून घेणे व त्या उतरवितांना हात न उचलता लिहिता आले तर उत्तमच. कारण त्यामुळे वेळेची बचत होते. तेव्हा ह्याचा फायदा घेऊन विभक्ती प्रत्ययाकरिता विशिष्ट खुणा मूळशब्दाला लागून काढावयास सांगितले आहे.

सर्वनामे

मराठीमध्ये एकंदर नऊ सर्वनामे आहेत व नामाप्रमाणेच त्यास वचन व विभक्ती यास अनुसरून विकार होतात. येथे सर्वनामासाठी विशिष्ट खुणा निर्धारित केल्या आहेत व त्यांना एकवचन–अनेकवचन व लिंग भेदाप्रमाणे रेषेच्या वर खाली लिहावयास सांगितले आहे व विभक्तिप्रत्ययाने त्यांचे विकार होत असल्यामुळे पूर्वीच्या परिच्छेदात सांगितल्याप्रमाणें ठरविलेल्याच खुणा सर्वनामाच्या-साठी निर्धारित केलेल्या खुणांना लावावयाच्या आहेत.

क्रियापदे

मूळ धातूला पाया कल्पून क्रियापदांची रचना केलेली आढळून येईल. जसे

जाणे, करणे, बसणे, पाहणें ह्यातील मूळधातू अनुक्रमे जा, कर, बस, पाहा ह्यांना लिहील्यास त्यांस णें लावूनच वाचावयास सांगितले आहे. क्रियापदाचे कृदन्त होतांना निरीक्षण केल्यास तकृदन्त, ताकृदन्त व तांकृदन्त ह्यांना एकाच प्रकारे लिहावयांस सांगितले आहे. लाकृदन्त उच्चाराप्रमाणे पूर्ण लिहावयास सांतगिले आहे. कारण त्याचे विशेषण कृदन्त करण्यास सोपे जाते. तसेच वाकृदन्त पूर्ण लिहिण्यास सांगितले आहे कारण षष्ठयन्त वाकृदन्तास षष्ठीविभक्ती-प्रत्ययाची खुण लावावयाची असते. व चतुर्थीत वाकृदन्ताच्या वेळी त्यास चतुर्थीची खूण लिहावयाची असते. ऊं कृदन्त व ऊंन कृदन्तासाठी विशिष्ट खूण केलेली आहे व णार कृदन्त साठी मूळ धातूस द्वित्त करण्यास सांगितले आहे व तीच खूण धातुसाधित विशेषणासाठी वापरावयास सांगितले आहे.


क्रिया विशेषणे

ही बहुधा अविकारी असल्यामुळे पुष्कळांसाठी विशिष्ट खुणा निर्धारित केल्या आहेत. पण कित्येकांना विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यये लागतात तेव्हा पूर्वी ठरविलेली विभक्तिप्रत्यये लिहिण्यास सांगितलेली आहेत.

उभयान्वयी अव्यये

ह्यांच्यासाठी देखील विशिष्ट खुणा निर्धारित केल्या आहेत.

मी केलेल्या प्रयत्नांचे ठोकळ मानाने वर विवेचन केलेले आहे व पुस्तक-रूपाने छापण्याचा प्रयत्न चालू आहे. खालील एक नमुना पाहा.



★★★

अनुक्रमणिका

मरी आईला केला नवस !

लेखक– ना. रा. शेंडे

रामप्रहरची ती वेळ होती. मी गाढ झोपेत होतो. एका सुंदर स्वप्नात मी रंगलो होतो. स्वप्न होत.....

एक गर्द झाडी आहे. मधोमध एक गगनचुंबी टेकडी आहे. टेकडीवर एक छोटसं देऊळ आहे. देवळावरील कळस निळ्या आभाळाला भिडला आहे. तो सूर्यासारखा लकाकत आहे. टेकडीच्या पायथ्याशी एक नदी आहे. तेथे झिप्राबाई उभी आहे. तिचे केस मोकळे आहेत. तिने कपाळभर कुंकु मळले आहे. तिचे दोन सुळके दात ओठावर घासले जात आहेत. देवळाच्या कळसावर तिची नजर रोखली गेली आहे. तिनं दोन्ही हात जोडले आहेत. ती मातामायचं गीत, पाण्याच्या प्रवाहात जागच्या जागी नाचत गात आहे–

माता माही माय, चांद्याच्या हाटा गेली
कुंकवाचा पट्टा ल्याली
माता माहे मायेचं, निम्वाखाली ठाण
गंगेचं पाणी आण
माता माहे मायेचं आंगण खोलखाल
टाकीन पहिला हेल
माता माहे मायेचा, सोन्याचा व् खराटा
झाडीन चारी वाटा
माता माहे मायेचं, आंगण पटांगण
घालीन लोटांगण ।। वो मातामाय ।।

आणि मग ती भराभर टेकडीवर चढून गेली. देवळाच्या अंगणात ती उभी राहिली. तोच विमानासारखी झेप घेत एक गरुड तिच्यापुढं उतरला. गरुडावर एक देवी बसली होती. तिच्या कमरेला सोन्याचा पट्टा होता. छातीवर माणिक-मोत्यांचे दागिने रुळत होते. कपाळावरील कुंकवाचा टिळा चकाकत होता. तिच्या एका हाती तलवार होती. दुसऱ्या हाती शंख होता. गरुडावरून ती खाली उतरली, तिनं शंख फुंकला. झिप्राबाई मात्र तशीच उभी होती. शंख फुंकल्यावर देवीनं धाव घेतली. झिप्राबाईला तिनं आलिंगन दिलं. तिला तलवार दिली;

शंखहि दिला. मग पुन्हा तिला कुरवाळून त्या देवीनं तिच्या भांगावर शेंदूर भरला. पायावर फुलं उधळली. आणि मग तिला गरुडावर बसवलं. त्यावेळी देवळातील घंटा घणघणली. गरुडानं उड्डाण केली. तो प्रथम त्या देवळाच्या कळसावर क्षणभर उभा राहिला; अन् नंतर त्यानं आकाशाकडे पाहून, तो वेगानं वर वर जाऊ लागला. मी. जोरजोरानं हाक देऊ लागलो–

'एऽ झिप्राबाईऽऽ....निघालीस कुठं तू ? '

आणि इतक्यात गंगारामनं माझ्या स्वप्नाचा, मला मोठमोठ्यानं हाका देऊन–माझे खांदे हलवून भंग केला! मी उठून बसलो. गंगाराम घाबऱ्या आवाजात म्हणाला,

"अरे नारायण, झिप्राबाईची हालत मोठी खराब झाली आहे!"

"म्हणजे ? काय झालं झिप्राबाईला ?" मी कळवळून विचारलं.

"मरीमायच्या गोटयावर तिनं आपलं मस्तक फोडलं !" गंगाराम हळहळला नि म्हणाला, "असं कां तिनं केलं, काही कळत नाही."

"अरेरे गंगाराम ! फार वाईट झालं !" आणि मग माझ्या तोंडून उद्‌गार निघाला, "मरीमायनं झिप्राबाईचाहि बळी घेतला !"

"नाही नारायण. ती मेली नाही. ती मरीमायच्या गोटयावर बसून सारखी डुलत आहे आणि मरीमायचं गाणं गात आहे."

"तसं असलं तरी गंगाराम, झिप्राबाई जगत नाही, असं समज. तुमचं चांदोरी गाव तिनं आता सोडलं !–ती मरीमायच्या स्वाधीन झाली !"

माझ्या बोलण्याचा रोख गंगारामच्या लक्षात आला नाही हे त्याच्या चर्येवरून मला आढळून आलं. तो गप्प राहिला. नंतर मला लगेच आठवलं–झिप्राबाई आदल्या दिवशी हातवारे करून काहीशा काव्यात्मक शब्दात उद्‌गारली होती–'मरी आईला केला नवस !'

चांदोरी हे गाव तसं अगदी छोटसं. सत्तर ऐंशी घरांची वस्ती. रेल्वेस्टेशनापासून काय किंवा मुख्य रस्त्यापासून काय हे गाव तीनचार मैल दूर होतं. गावाला ना कसलं सौंदर्य अन् ना कसलं महत्त्व. बरडावर ते वसलं होतं. गावात ना झाडंझुडंप आणि ना जवळपास नदी–नाला. अगदी ओसाड, अगदी रुक्ष. उन्हाळ्याच्या दिवसात तर या गावचा भकासपणा तीव्रतेनं जाणवणारा. अशा दिवसातच म्हणजे वैशाख महिन्यात काही कामासाठी मी या गावी गलो होतो आणि माझा एके काळचा खेडुत मित्र गंगाराम यांचे घरी चारआठ दिवसासाठी मुक्काम ठोकला होता. दुपारच्या भर तळपत्या उन्हातच मी गंगारामच्या घरी आलो होतो. अंगावरून घामाच्या धारा सारख्या वहात होत्या. तीनचार मैल

पायीच चालत आल्यानं थकवाहि फार आला होता. गंगारामच्या पडक्या झोपडीपुढ छोटासा मंडप टाकला होता. मी त्या मंडपात आलो तेव्हा पस्तीशी उलटलेली एक बाई तेथे बसली होती. अनेक ठिकाणी फाटलं असलेलं जाडंभरडं लुगडं ती नेसली होती. अंगातील चोळीचे बाहू लोंबकळत होते. डोक्यावर तिचे बुटके केस तिच्या ओबडधोबड चेहऱ्यावर भुरभुरत होते. वरचे दोन लांबोळे दात, तिच्या ओठावर सरकून तिच्या विद्रूप चेहऱ्याची दिमाखाने साक्ष देत होते. ती बसली होती त्या बाजूलाच काटक्याची एक मोळी टाकली होती. तीवर तेलाने मळलेली एक चुंबळ ठेवली होती. मला पाहताच तिनं डोक्यावरील आपला पदर सावरला. फाटक्या लुगड्यातून दिसणारी उघडी मांडी तिनं लुगडं काहीसं वर सरकावून झाकण्याचा प्रयत्न केला. कुणास ठाऊक, पण प्रथम दर्शनीच त्या विद्रूप बाईबद्दल मला घृणा वाटण्याऐवजी एक प्रकारची सहानुभूतिच वाटली. गंगारामनं मंडपातच एक लंगडी खाट बसायला टाकून माझं स्वागत केलं. तेव्हा त्या बाईनं गंगारामाकडे आपले मिचके डोळे रोखून विचारलं.

"कागा गंगाराम, कोण व्हय गा पाव्हणा ?"

"माझा नागपूरचा मित्र." गंगाराम खाटेचा लंगडा पाय घसरून पडू नये म्हणून तो नीट करीत उत्तरला.

"भर तपनीत आला मावुला. कसा घामाघूम झाला. शह्यरच्या लोकाले नाई सहन व्हत पायीपायी येणं !" आणि मग क्षणभर थांबून ती म्हणाली, "अगा गंगाराम, खाटेवर बोथरीबितरी टाक न गा. पाव्हण्याले दोरीवरच बसवशीन ?" असं म्हणून ती स्वतःच उठली आणि खाकऱ्याच्या कुंपणावर वाळत घातलेली गोधडी काढून तिनं ती खाटेवर टाकली. इतक्यात गंगारामची अस्तुरी मैना माझे पाय धुण्यासाठी गडवाभर पाणी घेऊन आली, तेव्हा तिच्या हातचा गडवा आपल्या हाती घेऊन, त्या बाईनं मी नको नको म्हणत असताहि माझे पाय धुतले. नंतर ती गंगारामच्या बायकोला उद्देशून म्हणाली, "अवो ए मैने, पाव्हण्याला आंबील देन् वो."

मैना काशाच्या एका पसरट वाटीत आंबील घेऊन आली तेव्हा ती बाई जरा खेकसूनच म्हणाली, "अवो काय वो मैने, तुले त् जरावी उमजत नाही. अशी कशी व् तू ? दो लेकराची माय झालीस तरीबी हाय तशीच आहेस! उनातान्हात आला बिचारा पाव्हना त् आंबलीसंग् कांदाबिंदा दे न." पण ती बाई इतके बोलून थांबली नाही. स्वतःच घरात जाऊन तिनं कांदा आणला आणि आपल्या मुठीनं ठेचून तो मला दिला.

त्या बाईचं ते अगत्य, ती सेवावृत्ति पाहून तर मी स्तंभितच झालो. गावची रीत, संस्कृति आणि सेवावृत्ति बाह्य सौंदर्यावर अधिष्ठित नाही; ती अन्तर्यामीच्या

सौंदर्यावरच रुजलेली असते याची मला प्रचीति आली. मन प्रसन्न झालं ! मी आंबील पीत असतांना ती बाई गंगारामला कळवळून म्हणाली,

"गंगाराम, ही मोरी घे आन् दोनतीन आणे दे गा दादा."

"नाही झिप्रे, नाही. घरी आहे थोडं इंधन. आज गरज नाही," गंगारामनं एका झटक्यात उत्तर दिलं, नकार दिला.

"नाई नोको म्हणू गंगाराम दादा. अगा, भल्या पाह्यटे उठून, तीन कोसावरच्या जंगलात जाऊन या भर तपनीत मोरी आणली. गावभर इचारलं. नाहीच म्हणत्येत समदे. तुही आस व्हती त् तूबी नाई म्हणत्स ! घरात दाणापाणी नाई म्हून...." ती बाई पुढं बोलू शकली नाही. तिच्या डोळ्यात आसवं तरळली !

मला तिचं कारुण्य पहावलं नाही. एक रुपया देत मी तिला म्हटलं,

"घे बाई हा रुपया. मोळी आज नाही विकली तर उद्या परवा विकली जाईल."

तिनं तो रुपया कपाळाला लावला. आणि मला तो परत करीत ती सद्गदित कंठानं म्हणाली,

"असं कसं व्हईल भाऊराया. आमच्या गावचे पाव्हणं तुमी. महिन्याभरात लई येळा उपासतापास व्हतेच. आजचाबी दिवस तसा !"

"नाही बाई, तसं म्हणू नकोस. घे हा रुपया, संकोच नको बाळगू." मी विनंती केली.

तिनं रुपया घेतला आणि माझ्या पायावर तिनं डोकं ठेवलं! होय हीच ती झिप्राबाई. तिचे बुटके केस नेहमी तिच्या तोंडावर भिरभिरत असायचे म्हणून गावचे लोक तिला झिप्री म्हणत. तसं तिचं नाव गौरा. मोठी कष्टाळु आणि मायाळु. तिचा गळा मोठा गोड. निळनिराळ्या चालीवर सुंदर सुंदर लोकगीतं ती म्हणायची. पावसाळ्यात रोवणं, हिवाळ्यात निंदनखुरपण करायची आणि उन्हाळ्यात मोळी विकायची.

चांदोरी गावात मी चार आठदिवसासाठी आलो खरा पण त्या गावी मरीमायनं कहर केल्याचं मला कळलं. महिन्यापूर्वी त्या गावची गायी-वासरं पटापट मेली. बकऱ्या, कोंबड्या दगावल्या आणि आता घराघरात देवीचा रोग पसरला होता! रोज कोणी ना कोणी मरायचा ! गाव कसं जर्जर झालं होतं, त्रस्त झालं होतं. रोज घरोघरी मातामायची गाणी गायिली जात होती—तिची पूजा केली जात होती. सुदैवानं त्या गावात फक्त गंगारामच्या घरी देवीनं संचार केला नव्हता. एकदोन दिवस मी गावात हिंडलो, गावकऱ्यांना भेटून देवीसारखे

रोग कसे होतात आणि त्याच्या प्रतिबंधासाठी काय करावं म्हणून समजावून सांगितलं पण माझं कोणीच काही ऐकेना. त्यांची मातामाय म्हणा, मरीमाय म्हणा तिचेवर श्रद्धा, निष्ठा. मंगळवार आणि शनिवार या दोन दिवशी तर मातामायच्या ठाण्यात स्त्रियांची पूजेसाठी गर्दी उसळायची. स्त्रियांनी केस मोकळे सोडायचे, कपाळाला कुंकवाचे मोठे पट्टे फासायचे आणि आरतीत तांदूळ, दही आणि निंबाचा पाला घेऊन त्यांनी मातामायजवळ तासन् तास गाणी म्हणत दुवा मागायचा.

आदल्या दिवशी शनिवारी सकाळी मला काही करमेना म्हणून बाजूच्या शेतावरील खळयावर गेलो आणि ऊन वाढत असतांना घराकडे यायला निघालो. खळ्याशेजारचा धुरा मी ओलांडला आणि पुढं पाऊल टाकतो तो एक कोंबडा विव्हळताना मला आढळला. माझ्या पोटात धस्स झालं! त्या दिशेनं जाणं बरं नव्हे असं मला वाटलं म्हणून मी मरीमायच्या दगडामागून यायला वळलो तोच झिप्राबाई आरती घेऊन मजकडे येताना दिसली. तिचे ते मोकळे केस, कपाळा-वरचा तो भला मोठा कुंकवाचा पट्टा, हळदीनं भरलेले पिवळे हात, कमरेला खोवलेला पदर पाहून प्रत्यक्ष मरीमायच माझ्या पुढं उभी आहे असं मला वाटलं. मी चरकलो. पुन्हा मागे वळणार तोच झिप्राबाईने हाक दिली. ' भाऊराया, जरा थांब गा. '

मी थबकलो. झिप्राबाई माझ्या अगदी पुढे आली. तिनं आरतीतील चिमूटभर कुंकू माझ्या कपाळाला लावलं. मग माझ्या डोक्यावर तांदूळ आणि निंबाचा पाला टाकला. आरती खाली ठेवून ती माझ्या पाया पडली अन् मग उठत ती उद्गारली,

" भाऊराया. सुखाचा राह्य माह्या बाप्पा! "

" झिप्राबाई " तोंडून निघालेला शब्द मी तसाच गिळला अन् म्हटलं, " गौराबाई, आज एकटीच पूजेला आलीस? "

" समदं गाव कसं मरावाले टेकलं हाय भाऊराया ! लहान लहान कोवऱ्या पोरांची गत नाही पाह्यवत! मरीमाय त् लई कोपली! अख्ख गाव खाल्याबिगर नाई शांत होवाची! कोणीतबी बळी देल्ला पाह्यजे. म्हून मी इचार केला...." तिचे डोळे अश्रूंनी डबडबले.

" काय विचार केलास गौराबाई ?" मी गंभीरपणे विचारलं. गौराबाईनं मजकडे रोखून पाहिलं. पदरानं डोळे पुसले. आणि मग ती कसल्या तरी तंद्रीत उत्तरली,

" मरी आईला केला नवस ! " एवढेच शब्द उच्चारून ती इकडे तिकडे न पाहता पुढे निघून गेली.

अनुक्रमणिका

आणि दुसरेच दिवशी रामप्रहरी गंगारामनं मला जागे करून झिप्राबाईच्या अवस्थेची करुण खबर दिली. गरुडावर बसून देवीबरोबर आकाशात उड्डाण करीत असलेल्या स्वप्नातील गौराबाईचं दृश्य माझ्या नजरेपुढं तरळू लागलं नि लगेच तिचे ते शद्ब आठवले, 'मरी आईला केला नवस!'

घाईघाईनं मी उठलो आणि गंगारामबरोबर मरीमायच्या दगडाकडे गेलो. गावच्या स्त्री-पुरुषांची तेथे गर्दी लोटली होती. लोक दुरूनच झिप्राबाईची ती अवस्था पाहून हळहळत होते!

मी गर्दीतून पुढे गेलो. झिप्राबाईचे कपाळ बरेच फुटले होते. रक्ताच्या धारा अंगावर वहात होत्या. मधूनच ती कपाळावरील रक्त तळहातावर घेऊन मरीमायच्या दगडावर शिंपडत होती. तिचे हातपाय थरथरत होते तरी कसावसा तोल सावरून ती तेथे थयथय नाचत होती. कंठावाटे शद्ब नीटसे फुटत नव्हते तरी ती गात होती—

कन्या मराई जल्मली, झाडंझूड दाट।
  असूदाचे लेले लोट ॥
कन्या मराई जल्मली, नहानी गोट्याची।
  खाण लागली मोत्याची ॥
माता मराईच संत्, समद्या पृथ्वीभर नांदे।
  रोगराई काटा भरे ॥
दे दान मराई बाई, नोको वदला घेऊ।
  तुही सेवा चाकरी करू ॥

आणि मग तिनं मरीमायच्या दगडाभवती फेर धरला; अन् मग हातवारे करीत ती सारखी किंचाळू लागली—

घे माय मराई आपला बळी।
  दडव उदराखाली ॥
घे बळी घे, घे बळी घे। तुह्या चरणावर ॥

असं पुन:पुन्हा ओरडून झिप्राबाईनं जोरजोरानं आपलं मस्तक त्या मरीमायच्या दगडावर आदळलं! रक्ताच्या चिरकांडयांनी तो दगड माखला गेला! आणि मग झिप्राबाईनं आपलं मस्तक त्या तांबडया दगडावर ठेवलं ते कायमचंच! होय, लोककल्याणार्थ झिप्राबाईनं स्वत:चा बळी दिला असंच म्हणायचं!

(नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने)

★★★

अनुक्रमणिका

ता त्या

लेखक : बाबा मोहोड

आजहि तात्या चाराच्या ठोक्याला अंथरुणातून बाहेर पडले. अंगणात आले. शिशिरातली गुलाबी थंडी अंगावर शहारे आणीत होती. आकाश निरभ्र होते. आजचे आकाशदर्शन किती मनमोहक होते !

तात्या चूळ भरून आपल्या खोलीत आले. अंगावरची पांढरीशुभ्र चादर त्यांनी व्यवस्थित अंगाभोवती लपेटली. कोपऱ्यातल्या चटईवर पद्मासन घातले. पाठीचा कणा ताठ झाला. आणि मग तात्यांचे गोड भजन सुरू झाले......

...मोसम कौन कुटिल खलकामी...

संतकवि सूरदासाचे हे भक्तिगीत तात्यांचे खूप आवडते गीत आहे. गेल्या २५–३० वर्षाच्या सार्वजनिक जीवनात या गीताने तात्यांना काही कमी आधार मिळाला नाही. तात्या नेहमी म्हणायचे–

'सूरदासाला मी गुरू मानतो. त्याचं वैराग्यच तसं थोर आहे. तरुण स्त्रियांच्या मनात विकार जागा होऊ नये म्हणून स्वतःचे डोळेहि त्या महापुरुषाने फोडून घेतले होते...'

तात्या संतसंस्कृतीचे गाढे अभ्यासक संतचरित्रे ऐकायची असतील तर ती तात्यांकडूनच ऐकावीत. ती ऐकत असतांना तात्यांच्या चेहऱ्यावरून भावगंगा वाहू लागते. कधी त्यांचे डोळे पाझरतात. कधी ओठ थरथरतात. कधी सर्वांग शहारते.

तात्या स्वतःच्या जीवनातहि काही कमी व्रतस्थ नाहीत. वयाच्या पंधराव्या वर्षी अविवाहित राहून जनसेवा करण्याची घेतलेली तात्यांची प्रतिज्ञा आज त्यांच्या पन्नाशीतहि तशीच अविचल राहिली आहे. सार्वजनिक कामात पडलेला माणूस कमीतकमी बंधनात असला पाहिजे अशी त्यांची प्रामाणिक धारणा आहे. अखेर तात्या एक ध्येयवादी पुरुष आहेत. आपली ही ध्येये त्यांनी किती लहानपणापासून जोपासली आहेत !...

... तात्या तेव्हा १३–१४ वर्षाचे असतील. त्यांच्या शाळेत त्यावेळी म. गांधी आले होते. गांधीजी म्हणजे हिंदुस्थानची देवता. पण किती साधा त्यांचा पोशाख ! किती आवेश त्यांच्या शद्बात ! अंगावर एक पंचा, एक धोतर आणि हातात एक काठी ! तात्यांच्या शाळेत महात्माजींचे एक व्याख्यानहि तेव्हा झाले होते. पण तात्यांना फक्त त्यातले समजले होते ते एवढेच......

अनुक्रमणिका

"...इंग्रजांच्या शाळेत शिकायचं नाही!"

बस्स. लहानग्या तात्याचा निश्चय पक्का झाला. तो घरातून बाहेर पडला. आश्रमात राहिला. विनोबा आणि गांधीजवळ खूपखूप शिकला.

आज तात्यांची नुकतीच पन्नाशी उलटली आहे. या मधल्या काळात तात्यांनी आपल्या भोवती कसलेहि धागेदोरे निर्माण केले नाहीत; नाही म्हणायला फक्त एकच जबरदस्त कोश तात्यांनी स्वतःभोवती निर्माण केला आहे आणि तो म्हणजे तात्यांचा लहानसा आश्रम.

दूर कोपऱ्यातल्या अंधारात एखादा मिणमिणता दिवा असावा तसा हा तात्यांचा आश्रम आहे. दूर जंगलात, आडवळणाला आणि डोंगराच्या पायथ्याशी. आदिवासी गिरिजनांना माणूस बनविण्यासाठी तात्यांचा हा लहानसा प्रयत्न आहे. आपले हे लहानसे स्वप्न तात्यांनी जोपासलेसुद्धा किती हळुवारपणे! जणू तळहातावरला फोड!

आणि हे तात्यांचे महाव्रत काही आजकालचे नवे नाही. गेली तीस वर्षे त्यांची यासाठी तपश्चर्या आहे. या आश्रमासाठी फार फार खस्ता खाल्या आहेत तात्यांनी. तात्यांनी काय नाही केले या आश्रमासाठी! भीक मागितली, उपवास काढले. आणखीहि पुष्कळ पुष्कळ केले. आणि म्हणूनच तात्यांना वाटते—

"...हा आश्रम म्हणजे माझा प्राण. माझा जिव्हाळा. माझं सारं कांही...'

तात्या स्वभावानं कट्टर सनातनी आहेत हे खरे पण ते एक आदर्श भक्तहि आहेत. सेवेला साधन मानून आपली आत्मोन्नति करणारात तात्या जमा आहेत. गांधीजीवरहि त्यांची नितांत निष्ठा. त्यांनी सांगितलेल्या चार गोष्टी कसलाहि गाजावाजा न करता कुणी अमलात आणल्या असतील तर त्या तात्यांनीच. तात्यांचे एक नेहमीचे घोषवाक्य आहे "... गांधीजी सांगून गेले..." आणि या एका युक्तीवादापुढे तात्या कुणाचेहि कधी ऐकत नाहीत.

तात्यांचा आणखीहि एक आग्रह आहे. आश्रमात फक्त मुलेच असावीत असे त्यांना वाटते. स्त्रियांची नुसती नावेहि तात्यांना नकों असतात. कधी कुणी सह-शिक्षणाचा प्रश्न उपस्थित केलाच तर तात्या अनेक युक्तिवाद करतात; म्हणतात—'मुलीमुलं एकत्र शिकली तर दोघांचंहि लक्ष अभ्यासात रहात नाही. निदान शिक्षणाच्या काळात तरी मुलामुलींना एकत्र ठेवू नये.'

तात्यांची ही मते अनेकांना शिळी वाटतात. त्यांच्या काही तरुण सहकारी मित्रांचाहि अनेकदा मतभेद होतो. पण तात्यांच्या आग्रहापुढे सारी शेवटी चूप बसतात. आश्रमाच्या परिसरात तात्याबद्दल कुठेहि अनादर नाही.

पण तात्यांचे हे आग्रह आणि हट्ट आता दिवसानुदिवस अधिकच वाढीला लागले आहेत. वास्तविक तात्यांचा हा थकता काळ. आयुष्याची उतरण. तात्यांचे सहकारीहि काही कमी चांगले नाहीत. बहुतेक सारे ध्येयवादी आहेत. तात्यांच्या मागून तात्यांचे काम निष्ठेने चालवितील अशा विचारांनी प्रेरित झालेले आहेत.

पण या निष्ठेतहि थोडे मतभेद आहेत. दोन पिढ्यातला संघर्ष आहे; नव्याजुन्याचे घर्षण आहे.

तात्यांचा एक तरुण सहकारी कधी कधी तात्यांना म्हणायचा—

"तात्या, तुम्ही इतके काटेकोर आग्रह का राखता? सारं आमच्यावर सोपवा. तुमच्या खांद्यावर आम्ही उभे आहोत. तुमच्यापेक्षा थोडे अधिक दिसले तर हा काही आमचा गुण नाही. तुमचा दोष नाही. तुमचीच ही देणगी."

"सगळीकडे कामाच्या परंपरा निर्माण होतात. वेळ आली की, कामं व्यक्तीपासून सुटी होतात. पण आपल्या देशात तसं घडत नाही. इथली थोर थोर कामंहि व्यक्तिभोवतीच फिरत राहतात. गुरुदेवांचं शांतिनिकेतन, गांधींचं सेवाग्राम......" तात्यांचा आणखी एक सहकारी विठ्ठल सांगायचा.

पण असे काही ऐकले की, तात्या जागेवर रहात नाहीत. ते दुःखी होतात. चिडतात. म्हणतात, "या आश्रमामागं माझ्या काही निष्ठा आहेत. काही कल्पना आहेत. रक्ताच्या नव्हे- आत्म्याच्या मोलानं मी त्या जोपासल्या आहेत. माझी ही स्वप्नं निदान माझ्या डोळ्यासमोर तरी कुस्करू नका."

तात्यांचा स्वर कंपित होतो. दृष्टि कितीतरी दूर खिळते. डोळ्यांच्या कडा पाणावतात आणि मग समोरची मंडळी केव्हा पांगली हे तात्यांच्या लक्षातहि येत नाही.

अलिकडे तात्यांच्या आश्रमात असे अनेकदा घडते. तात्यांना हे सारे असह्य होते. कधीकधी त्यांच्या मनात येते—

"माझ्या डोळ्यादेखत असं काही घडण्यापेक्षा हे डोळेच......"

कधीकधी तात्या म्हणतात—

"गुरूचा घात नेहमी शिष्यांकडूनच होत असतो. येशूचा नव्हता का त्याच्या एका शिष्याकडूनच"... आणि मग क्रॉसवर लोंबलेले येशूचे निर्जिव शरीर तात्यांना दिसू लागते. पुष्कळदा ते शरीर आपलेच आहे असा तात्यांना भास होतो. आणि मग कितीतरी दिवस तात्या आपल्या विचारात सुन्न राहतात.

अनुक्रमणिका

अलिकडे दिवसेंदिवस तात्यांची ही स्थिति वाढत आहे. वास्तविक तात्या म्हणजे केवढी उंच व्यक्ति. आजारी मुलांच्या पाठीवरून रात्रंदिवस हात फिरवीत उपनिषद् म्हणणारे तात्या, विशेषत: भारतीय संस्कृति शिकवितांना स्वत:चे देहभान विसरणारे तात्या, आईच्या वात्सल्यानें सर्वांची काळजी घेणारे तात्या, तात्यांचे कितीतरी वाखाणण्यासारखे आहे. तात्यांचा संस्थेबद्दलचा लोभ, जिव्हाळा. आपुलकी सारे काही विलक्षण आहे. पण या उत्कटतेतच तात्यासाठी एक गंभीर धोकाहि निर्माण झाला आहे....

तात्यांना ही आश्रमाची व्यवस्था मोडायला नको आहे. तात्यांनी संस्थेसाठी घालून दिलेले नियम काटेकोरपणे आणि युगानुयुगे असेच चालत रहायला हवे आहेत. तात्यांना आपल्या शरीर-प्राणाची नाही तेवढी आश्रमाची आसक्ति आता निर्माण झाली आहे. पण तात्या या आसक्तीचेहि समर्थन करतात. म्हणतात– "ही आसक्ति असली तरी सात्विक आसक्ति आहे. माणसाला इतकी असायलाच हवी. ही काही संन्याशाला असलेली तुंब्याची आसक्ति नाही. जीवनभर जोपासलेल्या मंगल स्वप्नाची ही आसक्ति आहे."

आणि मग असे काही विचार मनात आले की, तात्यांना खूप धीर येतो. त्यांना वाटते, 'माझी स्वप्नं चुरगळायचा माझ्या सहकाऱ्यांना तरी काय अधिकार ! मी त्यांना लहानाचं मोठं केलं, अंधारातून प्रकाशात आणलं. डोंगरावर कुठंतरी कंदमुळं उकरीत बसले असते. आज त्यांची स्थिति तशी नाही. पंख आलेली पाखरं आहेत ती. त्यांनी आता वाटेल तेवढी वाटचाल करावी. त्यांच्या कर्तृत्वाला अवघं विश्व मोकळं आहे. त्यांच्या दृष्टीनं माझं काम आता संपल्यासारखंच नाही का ? '

तात्यांचे हे म्हणणे खरोखरच खोटे नाही. त्यांची शिष्यांबद्दलची ही अनासक्तीहि फारफार मोलाची आहे. पण या सर्वात एक दोष राहून गेला आहे. पिठात बेमालूमपणें कोंडा लपून राहतो तसा. तात्यांना आपल्या आसक्तीला संरक्षण हवे आहे. पण तात्यांना या कटु सत्याची जाणीव नाही असे नाही. या सुप्त जाणिवेमुळेच अलिकडे ते उद्विग्न दिसतात. अनेकदा निराश दिसतात. कधीकधी म्हणतात–

'माझ्या मर्यादाच त्या आहेत. त्यांचीहि जोपासना मला केलीच पाहिजे.'

आजहि तात्यांच्या मनात असेच काहीतरी चालू आहे.

विचाराच्या तंद्रीतच तात्यांनी आपली प्रार्थना संपविली. दाराशी उभ्या असलेल्या मुलाने सांगितले,

"तात्या, वेळ झाली वर्गाची."

अनुक्रमणिका

खिशातल्या घड्याळाला हात लावीत तात्या मुलामागून निघाले. पन्नास वर्षांचे, अकाली वार्धक्य आलेले तात्या वर्गात शिरले. त्यांना आज ईशोपनिषदावर बोलायचे होते.

'ईशावास्यमिदम् सर्वम्...'

तात्यांचा तास सुरू झाला. समोरची मुले ऐकत होती. लिहीत होती.

'तेन त्यक्तेन भुंजीथा:'

तास संपवितांना तात्यांच्या वाणीतून मध ठिबकले. तात्या आपल्या मधुर तंद्रीतून वर्गाबाहेर पडले. पण काही क्षणानंतरच पुन्हा पहिल्या विचारांनी त्यांना धक्का दिला. तात्या भांबावले. सारं जग आपला पाठलाग करीत आहे असा त्यांना भास झाला. आणि मग एखाद्या भयभीत कोकरासारखे तात्या खोलीकडे निघाले. जणू वाऱ्यावर तरंगत. आपण यावेळी असे कां वागलो हे विचार करूनहि तात्यांना कळले नाही....

बिचारे तात्या !

★ ★ ★

समाधि

"थियटरमधे तुम्ही नाटक पाहिलं, नाही? लोक सगळे एकमेकांशी बोलत असतात, अशा वेळीं पडदा वर जातो. मग सगळ्यांचे सारे मन त्या अभिनयाकडे लागते. लोक मग आणखी कशाहिकडे बघत नाहीत. समाधि म्हणजे स्वत:मधे असे प्रविष्ट होऊन जाणे, असे मग्न होऊन जाणें.

"फिरून पडदा पडल्यावर लोक पुन्हा इकडेतिकडे पाहू लागतात. मायारूपी पडदा पडल्यास माणूस फिरून बहिर्मुख होतो."

—श्री रामकृष्ण परमहंस

आपण आणि आपले मन

"मनाला ज्या रंगाने रंगवाल त्याच रंगाचे ते होऊन जाते. मन जणू धोब्याकडून आलेला कपडा. तुम्ही त्याला ज्या रंगात डुबवाल त्या रंगाचा तो होऊन जातो.

"आधी चित्तशुद्धि. त्यानंतर मनाला जर ईश्वराच्या चिंतनात लावून ठेवाल तर ते त्याच रंगाचें होऊन जाईल."

—श्री रामकृष्ण परमहंस.

रॉबर्ट बर्न्स

लेखक प्रा. इ. जी. माने

स्कॉटलंडचा प्रसिद्ध कवि रॉबर्ट बर्न्स याचा जन्म १७५९ साली जानेवारीच्या २५ तारखेला झाला.

तो म्हणतोः– "जन्मापासूनच शेत व नांगर यांच्याशी माझा निकट संबंध होता. शेतीच्या कामात आईवडिलांना माझे सहाय्य नेहमी होत असे. स्कॉटलंड देशात प्रचलित असलेल्या रीतीप्रमाणे दोघादोघांच्या जोडीने शेतात काम करीत असतानांच मला प्रथम कविता करण्याचा नाद लागला. अशाच कामात एका तरुण शेतकरी मुलीच्या सोबतीचा लाभ मला झाला व तिच्यावरच मी माझी पहिली कविता रचली." "Once I loved a bonnie lass" हे बर्न्सने आपल्या पहिल्या कवितेत काढलेले उद्गार त्याच्या भावी काव्यरचनेचे द्योतकच समजले पाहिजे. त्यावेळी त्याचे वय केवळ १६ वर्षाचे होते.

आईवडील साध्या वळणाचे, धार्मिक व प्रेमळ स्वभावाचे. आर्थिक स्थिति अत्यंत गरिबीची, त्यात शेताचे उत्पन्न अनियमित व अनिश्चित. अशा दारिद्र्या-वस्थेतून मुक्त होण्याच्या विचाराने, रॉबर्ट काही दिवसांकरिता दुसऱ्या गावी जमीन मोजमाप करण्याचे काम शिकण्याकरिता गेला. काम शिकण्यात जरा त्याने पटुत्व दाखविले तरी सोबत्यांच्या संगतीने मद्यप्राशनाची घातक संवय त्यास लागली व मदिरेच्या नशेत अनेकांशी त्याने भांडणतंटे केले. नंतरची चार वर्षे केवळ नावापुरती शेती करण्यात घालविली व ह्याच काळात त्याचे Alison Begbie नावाच्या शेतकरी घराण्यातल्या तरुणीवर प्रेम जडले. ज्या कवितांमुळे बर्न्सला नंतर प्रसिद्धी मिळाली त्यात मेरी मॉरिसन् ह्या मुलीचे नाव जरी अनेकदा आले असले तरी त्याने त्या Alison Begbie वरच रचल्या आहेत हे विसरता कामा नये. परंतु त्या मुलीने त्याच्याशी लग्न करण्याचे नाकारले.

१७८३ मध्ये बर्नस्च्या वडिलांची प्रकृति खालावली. शेतातले काबाड-कष्टाचे जीवन, चिंताजनक आर्थिक परिस्थिति व मुलाबाळांचे अनिश्चित भवितव्य या सर्व गोष्टींचा त्यांच्या जीर्ण शरीरावर दुष्परिणाम होऊन त्यांना क्षयरोगाचा आजार जडला व १७८४ मध्ये ते दिवंगत झाले. रॉबर्ट, त्याचा भाऊ गिलबर्ट व आई यांनी संकटांना तोंड देण्याचा दृढ निश्चय केला. पण सर्व श्रम

अनुक्रमणिका

व्यर्थ. काही सुचेना म्हणून रॉबर्टने Jamaica ला जाऊन खूप पैसे मिळवावे असे ठरविले व जाण्याची त्याची सर्व तयारीहि झाली. पण आपण रचिलेल्या कविता जर प्रसिद्ध केल्या तर कदाचित् काही पैसे मिळतील या आशेने रॉबर्टने Kilmarnock येथील John Wilson नावाच्या प्रकाशकाला आपला कविता-संग्रह दाखविला. John Wilson ने ६०० प्रति छापून प्रसिद्ध केल्या. Kilmarnock प्रकाशन ह्याच नावाने आजहि त्याची प्रसिद्धि आहे. त्या संग्रहात बर्न्सच्या अनेक लोकप्रिय कविता आहेत. त्यापैकी The Coltar's Saturday Night, To a Mouse ह्या सर्वांच्या परिचयाच्या होऊन बसल्या आहेत. लगेच रॉबर्ट बर्न्स हा काव्य रसिकांच्या चर्चेचा व कौतुकाचा विषय बनला. Ayr नावाचे आपले खेडे सोडून लवकरच तो स्कॉटलंडची राजधानी Edinburgh येथे आला व तेथे त्याचा थोरामोठयांकडून बराच गौरव झाला. १७८७ मध्ये या लोकप्रिय कवितांची दुसरी आवृत्ति निघाली व १७९३ च्या तिसऱ्या आवृत्तीत आणखी काही नव्या कवितांचा व भावगीतांचा समावेश करण्यात आला. त्याची अत्यंत नावाजलेली कविता Tam O' Shanter ही तिसऱ्या आवृत्तीत प्रसिद्ध झाली.

अखंड दारिद्रय हे बर्न्सच्या घराचे वैशिष्ट्च होते. कवि म्हणून जरी बर्न्स सर्वसाधारण जनतेच्या परिचयाचा झाला तरी दारिद्र्यावस्थेतून त्याला मुक्तता मिळाली नाही. केवळ ३७ वर्षांचे जीवन. मनस्वास्थ्य, आर्थिक चिंतेतून सुटका किंवा गृहसौख्य या गोष्टी त्याला लाभल्या नाहीत. १७९६ साली संधिवाताचा आजार होऊन कवि बर्न्स इहलोक सोडून गेला.

बर्न्सच्या बऱ्याचशा कविता त्याने स्कॉटलंड देशातल्या बोलीत (Dialect) रचल्या. समकालीन कादंबरीकार सर वॉल्टर स्कॉट यांच्यासारखेच बर्न्सचे प्रेम भूतकाळावरच अधिक होते व त्याच्या काव्याची स्फूर्ति भूतकाळातच रमत होती असे म्हटल्यास वावगे होणार नाही. त्याने रंगविलेली मानवतेची निरनिराळी दृश्ये ही निसर्गात त्याला दिसली. दैनंदिन जीवनात दिसून येणारे मानवाचे हास्य, अश्रू, आशा, निराशा व तसेच फुले व पशुपक्षी या सर्वांचे प्रतिबिंब रेखाटण्यात बर्न्सने आपल्या काव्यकलेचा यथार्थ उपयोग केला. शेतकरी जीवन कंठित असताना मोकळ्या हवेत राहण्याची सवय त्यास जडली. खेडूत जनतेच्या निकट सहवासात राहिल्याने त्या समाजाचे जीवनरहस्य ओळखून त्याचे सूक्ष्म आकलन करण्यास तो समर्थ झाला. अशिक्षित अशा या समाजाचा धर्मभोळेपणा, साधासुधा जीवनक्रम, मनोरंजनाचे विविध प्रकार, इत्यादि गोष्टींचा परिणाम त्याच्या मनावर झाला हे जरी खरे, तरी धर्माच्या नावाखाली अत्याचार करणारे ढोंगी धर्मनेते यांच्यावर उपहासात्मक काव्याचे ताशेरे ओढण्यास त्याने मागेपुढे

पाहिले नाही. Holy Fair; Holy Willie's Prayer, या विडंबन कविता प्रसिद्धच आहेत.

व्यक्तिस्वातंत्र्य त्याला मौल्यवान वाटत होते कारण तो खरा प्रजातंत्र-वादी होता.

अत्यंत गंभीर विचारहि बर्न्सने प्रांतिक बोलींच्या मोहक शब्दात व्यक्त केले. काव्यरचना त्याला सहज साधत होती. एका कवितेत तो म्हणतो की मी काव्यरचना केवळ मौजेखातर करतो.

Some rhyme to court the countra clash
An' raise a din;
For me an aim I never fash,
I rhyme for fun.

गंमत म्हणून काव्यनिर्मिति करणे हे अखेरपर्यंत तो विसरला नाही. कारण आयुष्याच्या अखेरीला शरीर जीर्ण होऊन अंतःकरण चिंताव्याकुळ झाले तरी काव्यसंगीताचे मंजुळ सूर काढण्याचा त्याचा नाद काही सुटला नाही.

आवेग, भावनोत्कटता आणि सुटसुटीतपणा या तीन गुणांनी बर्न्सच्या काव्याला विभूषित केले आहे मग ते उपहास काव्य असो किंवा भावगीत असो. Tam O' Shanter ही कविता तुफानाच्या वेगाने धावते; The Jolly Beggars ह्या कवितेत उंच कड्यावरून कोसळून पडणाऱ्या प्रचंड प्रपाताचा वेग आहे. The Coltar's Saturday Night या कवितेची गति प्रथम मंद असली तरी कविता संपण्यापूर्वी तिची गति सळसळणाऱ्या नागिणीसारखी चपल होते. त्याची भावगीते माधुर्याने तर ओतप्रोत भरलेली आहेतच परंतु त्यात सूर्यप्रकाशाची ऊब व गिरिशिखरावरच्या मंजुळ वायूची झुळुकहि आहे. निसर्गावरील असीम भक्ति व त्याचे सूक्ष्म ज्ञान, मनोवेधक चटकदार संवाद, अलंकारांच्या सहाय्याने शद्बचित्रे रेखाटण्याचे कौशल्य हे गुण बर्न्सच्या काव्यात प्रामुख्याने दिसतात. स्कॉटलंड देशाच्या भावगीतांची परंपराच जणू काय त्याच्यात एकवटलेली होती. Cowfer कवीचे प्रेमळ घरगुती वातावरण व Crabbe कवीची सत्यसंशोधक वृत्ति बर्न्समध्ये एकत्रित झाली होती. परंतु त्यात विनोदाची भर पडून त्याचे काव्य दोहोपेक्षा अधिक सरस झाले आहे. रोजच्या व्यवहाराच्या अनुभवातून निर्माण झालेले त्याचे काव्य वाचले म्हणजे असे वाटते की, बर्न्स हा सामान्य जनतेचा उज्ज्वल प्रतिनिधि आहे. हाल अपेष्टा सहन करीत कष्टाने जीवन कंठणाऱ्या किसान तरुणीवर रचलेली त्याची भावगीते इंग्रजी वाङमयात अजरामर आहेत. अशाच "Ae Fond kiss" "आवडते चुंबन," ह्या एका

गीतात तरुण तरुणीला म्हणतो," आपण जर एकमेकांच्या अंधप्रेमाने बेहोष झालो नसतो, आपली ओळखच मुळी झाली नसती तर प्रेमभंगाचा धक्का आपल्याला पोहोचलाच नसता."

Had we never lov'd sae kindly,
Had we never lov'd sae blindly,
Never met–or never parted,
We had ne'er been broken-hearted.

इतक्या मोहक व घरगुती शद्बात प्रेमनैराश्याची उत्कट भावना व्यक्त करून वर्न्सने आपल्या काव्यकलेची कमाल केली. तसेच Auld Lang Syne, "जुन्या मित्रांची स्मृति" ही कविता तर फारच लोकप्रिय झाली आहे. अशा प्रकारच्या त्याच्या अनेक कवितांचे अध्ययन करणाऱ्यांची खात्री पटेल की, वर्न्स हा मानवतेचा राजकवि होता. भूतदया हेच त्याचे ब्रीदवाक्य. मग तो मानव असो किंवा पुष्पे, पक्षी, अथवा जनावरे असोत. त्याचे अंतःकरण इतरांचे दुःख पाहून विव्हळून जात असे.

एका सुंदर, नाजुक व तांबुस रंगाच्या Daisy नांवाच्या लहानशा फुलाला पाहून वर्न्स म्हणतो, " हे चिमुकल्या विनयशील पुष्पा, तुझी आणि माझी भेट या अशुभ समयी झाली हे फारच वाईट झाले. हे मोहक हिरकणी, तुला तोडल्यां-शिवाय राहणे माझ्या शक्तीबाहेरचे आहे.

Wee, modest crimson tipped flower,
Thou's met me in an evil hour,
For I main crush among the store
Thy slender stem
To spare thee now is past my power,
Thou bonnie gem.

तसेच हे दुसरे प्रेमगीत पहा. सारे विश्व कसे प्रेमाने भरले आहे व तरुण तरुणीचे प्रेम किती उदात्त स्वरूपाचे असते याचे वर्णन " A Red Red Rose. " या भावगीतात दिसेल. तरुण म्हणतोः– " माझी प्रियकरणी जून महिन्यात फुललेल्या लालबुंद गुलाबासारखी मोहक दिसते. तिच्यात संगीताचे माधुर्य भरलेले आहे. सात समुद्राच्या जलसंचयाला कदाचित् ओहोटी लागेल पण माझ्या प्रेमसागराला ओहोटी लागायची नाही. पर्वत वितळून जलप्रवाहासारखे वाहून जातील. परंतु प्रेयसीवरचे माझे प्रेम कदापि ढळणार नाही. तिच्या सहवासाच्या स्वर्गसुखासाठी दहा हजार मैलांचे अंतर पायाखाली घालण्यासहि मी तयार आहे."

अनुक्रमणिका

A Red Red Rose

O my love's like a red, red rose
That's newly sprung in June
O my love's like the melodie
That's sweetly played in June !
As fair art thou my bonnie lass,
So deep. in love am I;
And I will love thee still, my dear,
Till a' the seas gang dry
Till a' the seas gang dry, my dear
And the rocks melt wi the sun,
I will love thee still, my dear,
While the sands O' life shall run.
And fare thee my bonnie dear,
And fare thee weel a while !
A I will come again my love,
Tho' it were ten thousand mile.

"Jean" नांवाच्या कवितेतहि बर्न्सने याच विषयावर उद्गार काढले आहेत. एक प्रियकर प्रेयसीला उद्देशून म्हणतो, चारहि दिशांनी वाहणारे वारे आहेत. परंतु प्रियकरणी Jean पश्चिम दिशेला राहते. तिकडून येणारा वारा मला प्रिय आहे. डोंगर, नद्या, वृक्ष माझ्या मार्गात म्हणून शरीराने जरी Jean-जवळ जाणे शक्य नाही तरी प्रेमोर्मींनी भरलेले माझे अंत:करण पक्षासारखे उडून तिच्याजवळ जाऊ शकेल.

Jean

Of a' the airts the winds can blow,
I dearly like the West,
For there the bonnie lassie lives,
The lassie I love best :
There wild woods grow, and rivers flow,
And many a hill between;
But day and night my fancy's flight
Is ever wi' my Jean.

अनुक्रमणिका

I see her in the dewy flowers,
I see her sweet and fair:
I hear her in the tuneful birds.
I hear her charm the air;
There is not a bonnie flower that springs
By fountain, shaw, or green;
There's not a bonnie bird that sings,
But minds me o' my Jean.

मानव आपल्या अपत्यावर कदाचित करणार नाही इतके प्रेम बर्न्सने पशुपक्षावर केले आहे. संध्यासमयी एका छोटयाशा पक्षाला पाहून खालील विचार त्याच्या मनात आले:—

" टणटण उडया मारणाऱ्या निराश्रित पाखरा, वसंत ऋतूत तुझे मंजूळ गाणे अनेकदा ऐकून माझे मन प्रफुल्लित झाले. पण काय ही तुझी अवस्था आता ? फडफडणारे पंख झाकून व इवलाले डोळे मिटून विश्रांतीकरता तू आता कोठे जाणार ?"

" Ilk happing bird, wee helpless thing
That in the merry months of spring
Delighted me to hear thee sing
What comes of thee ?
Where wilt thou cover thy chittering wing
And close thy e'e ?"

" To A Mouse " ही बर्न्सची अत्यंत नामांकित कविता आहे. शेत नांगरीत असतांना बर्न्सने एका छोटयाशा उंदराच्या बिळाला उखरून टाकले. त्या वेळेस भितीने थरथर कापणाऱ्या उंदराचा चेहरा पाहून त्याचे कोमल अंतःकरण भरून आले व लगेच आश्वासन देण्याच्या सदिच्छेने कवि त्याला म्हणतो, मला अतोनात खेद होतो की, मानव निसर्गाचे सहकारित्व झुगारून देऊन प्राणिमात्रांवर प्रभुत्व गाजवितो. म्हणूनच तुम्ही सारे आमच्या उन्मत्त अरेरावीचा तिरस्कार करता. पण हे चिमुकल्या जीवा, माझे अस्तित्त्व क्षणभंगुर असून मीही तुझ्यासारखाच मर्त्य आहे.

या कवितेत बर्न्सच्या भूतदयेची परमावधि झाली यात शंका नाही.

I am truly sorry man's dominion
Has broken Nature's social Union,

An' justifies that ill opinion
Which makes thee startle
At me, thy poor earth-born companion;
An' fellow-mortal !
Still thou art blest compared with me !
The present only toucheth thee:
But oh! I backward cast my eye
On prospects drear !
And forward tho' I canna see,
I guess an' fear !

या कविता वाचतांना Coleridge च्या प्रसिद्ध ओळीची आठवण होते:–

He prayeth well, who loveth well
Both man and bird and beast
He prayeth best who loveth best
All things both great and small;
For the dear God who loveth us,
He made and loveth all.

Wordsworth ने म्हटल्याप्रमाणे काव्य मानवाच्या अंत:करणातून निर्माण होते व अंत:करणातच शिरकाव करते. हे काव्याचे लक्षण बर्न्सच्या बाबतीत तंतोतंत खरे आहे ! इतर कवींच्या कविता या कुंडीत वाढविलेल्या फुलवेली आहेत. पण बर्न्सच्या कविता ह्या यदृच्छेने वाढणाऱ्या निसर्ग लता आहेत.

(रॉबर्ट बर्न्सच्या द्वितीय जन्मशताद्विउत्सवाच्या निमित्ताने नागपूर नभोवाणी केन्द्रावरून केलेले भाषण. नागपूर नभोवाणीच्या सौजन्याने)

★★★

अनुक्रमणिका

आजची पाश्चात्य् कादंबरी

लेखक : **स. शं. देसाई**

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या कालात युरोपात कादंबरीची कला मागे पडली आहे, असे तिकडील साहित्य-समीक्षकांचे आणि टीकाकारांचे म्हणणे आहे. त्याची कारणे अनेक असून त्याचा मी अन्यत्र उहापोह केला आहे. ह्या लेखामध्ये मला प्रकाशात असलेल्या काही कादंबरीकारांसंबंधी लिहावयाचे आहे.

इंग्लंड

इंग्लंडमध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीपासून आजतागायत एकहि महान कादंबरीकार उदयास आला नाही. ग्रॅहम ग्रिन हाच सांप्रतचा श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून समजला जातो. केवळ इंग्लंडमध्येच नव्हे, तर इंग्लंड बाहेरहि विशेषकरून रशियामध्ये तो फार लोकप्रिय आहे. तो धर्माने कॅथलिक असून, पाप आणि अपराध हे त्याच्या कादंबऱ्यांचे विषय असतात. नैतिक अधिष्ठान हा त्याच्या साहित्याचा स्थायी भाव आहे. आणि त्याच गुणावर तो वाचकाचे मन आपल्या लिखाणाकडे आकृष्ट करून घेतो. त्याने कथालेखनहि बरेच केले असून, त्याच्या कादंबऱ्यांवर बोलपटहि निघाले आहेत. The Third Man ह्या नावाच्या काहीशा रहस्यमय आणि काहीशा गुप्तहेर कथेवर तयार झालेला बोलपट हिंदुस्थानात काही वर्षांमागे फार गाजला होता. ग्रिन रशिया-मध्ये लोकप्रिय होण्याचे कारण म्हणजे त्याचा वसाहतवादविरोध होय. अमेरिके-विषयीहि तो नर्म उपरोधाने लिहितो. The Quiet American ही त्याची कादंबरी ज्यांनी वाचली असेल त्यांना त्याची साक्ष पटेल.

स्त्री कादंबरीकारांमध्ये 'एलिझाबेथ बोवेन' आणि 'पामेला हॅन्सफोर्ड जॉन्सन' ह्या दोघींचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. एलिझाबेथ बोवेन ही आयरिश आहे. आयरिश आणि फ्रेंच पार्श्वभूमीवरील तिच्या कादंबऱ्यांनी वाचकांच्या मनाची चांगलीच पकड घेतली आहे. तिची बरीच वर्षे पॅरिसमध्ये गेली आहेत.

नेविल शट (Nevil Stute) हा एक हळुवार मनाचा कादंबरीकार आहे महायुद्धाच्या समाप्तीच्या सुमारास त्याची Round the Bend ह्या नावाची कादंबरी हिंदुस्थानात चांगलीच गाजली होती. The Beach ह्या कादंबरीने त्याला केवळ कॉमन्वेल्थमध्येच नव्हे, तर अमेरिकेतही मोठी प्रसिद्धि मिळवून दिली. ह्या कादंबरीवर बोलपटहि निघाला आहे.

सी. पी. स्नो (C. P. Snow) हाहि एक बऱ्यापैकी कादंबरीकार आहे.

अनुक्रमणिका

तो श्रेष्ठ दर्जाच्या साहित्य समीक्षक आणि टीकाकार म्हणूनहि प्रसिद्ध आहे. टाईम्स लिटररी सप्लिमेंटचा संपादक आहे.

अॅल्डस हक्स्ले हे तात्विक कादंबऱ्या लिहितात. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये पांडित्य फार येते, त्यामुळे सामान्य वाचक त्यांच्या वाटेला जात नाही. पांडित्यामुळे त्यांची कलाहि विघडून गेली आहे असे टीकाकारांचे म्हणणे आहे.

जॉर्ज ऑर्वेल ह्यांच्या Nineteen Eighty Four आणि Animal Farm ह्या दोन कादंबऱ्या फार गाजल्या. पूर्वी हा लेखक कम्युनिस्ट होता. रशियातील शुद्धिसत्रानंतर युरोपातील इतर बऱ्याच लेखकांबरोबर तो कम्युनिस्ट विरोधक बनला. Animal Farm ही त्याची कम्युनिस्ट विरोधी कादंबरी आहे. त्याच्या अकाली मृत्यूमुळे एक मोठा कम्युनिस्ट विरोधक आणि चांगला लेखक नाहीसा झाला आहे.

एव्हेलिन वॉ (Evelyn Waugh) हा आणखी एक कॅथलिक कादंबरीकार आहे. तो उपरोधिक साहित्य चांगले लिहितो.

चार्लस मॉर्गन हा गूढवादी कादंबरीकार होता. त्याचे साहित्य दुर्बोध असल्यामुळे ते विशेष लोकप्रिय होऊ शकले नाही.

जॉइस कॅरी (Joyec Cary) ह्या प्रथितयश कादंबरीकाराच्या अकाली मृत्यूने इंग्रजी कादंबरीची फार मोठी हानी झाली, असे टीकाकारांचे म्हणणे आहे. तो सुरुवातीस चित्रकार होता; नंतर आयर्लंडमध्ये समाजशास्त्रज्ञ बनला. पुढे नायजेरियामध्ये त्याने सनदी अधिकारी म्हणूनहि नोकरी केली. गेल्या दोन्ही महायुद्धात तो प्रत्यक्ष आघाडीवर लढला होता. ह्या सर्व अनुभवांचा त्याने आपल्या साहित्यात उपयोग केल्यामुळे त्याला ठळकपणा प्राप्त झाला.

Angus Wilson हा वरील कादंबरीकारांमध्ये सर्वात तरुण आहे. त्याची आताच Best Seller लेखकांमध्ये गणना झाली आहे.

जुन्या लेखकांमध्ये सॉमरसेट मॉम ह्यांची Cataline ही स्पॅनिश पार्श्वभूमीवरील युद्धोतर कादंबरी आहे. पण वृद्धापकाळामुळे मॉमनी आता लेखनसन्यास घेतला आहे. 'कॉम्प्टन मॅकेंझी' आणि 'प्रिस्ट्ले' हे दोघे अद्याप लिहीत आहेत.

फ्रान्स

युद्धोत्तर कालात आणि तदनंतर फ्रेंच साहित्यात कादंबरी वाङमय जरी विपुल निर्माण झाले असले, तरी त्याला दर्जा प्राप्त झाला नाही. ज्या कादंबरीने आंरी बार्ब्युस (Henri Barbusse) ला नोबेल पारितोषिक मिळवून दिले, त्या Le Feu (Under Fire) ह्या पहिल्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवरील कादंबरीसारखी कादंबरी दुसऱ्या महायुद्धानंतर फ्रेंच साहित्यात लिहिली गेली

नाही. आजच्या फ्रेंच कादंबरीकारांमध्ये वरेच कादंबरीकार जुने आहेत. काफ्का (Kafka) आज हयात नसला, तरी तो युद्धोत्तर फ्रेंच कादंबरीकारातील सर्वात मोठा कादंबरीकार म्हणून समजला जातो. त्याची The Castle ही कादंबरी फार गाजली. पण त्या कादंबरीपेक्षा त्याच्या डायऱ्यांनीच त्याला अधिक कीर्ति मिळवून दिली. आपल्या डायऱ्या प्रसिद्ध करू नयेत असे त्याने मृत्युसमयी लिहून ठेवले होते. पण त्या प्रसिद्ध झाल्या हे जागतिक साहित्याचे सद्भाग्यच म्हटले पाहिजे. काफ्काच्या दोन कादंबऱ्या अपूर्ण राहिल्या. असे सांगतात, की काफ्काने जे साहित्य लिहिले त्यापेक्षा त्याच्यावर लिहिले गेलेले साहित्य अधिक आहे. त्यावरून हा कादंबरीकार केवढ्या मोठ्या तोलाचा होता ते कळून येते. काफ्काला त्याच्या डायऱ्यांनी जी कीर्ति मिळवून दिली तशीच कीर्ति 'आंद्रे जीद' ला त्याच्या 'जर्नलनी' मिळवून दिली. १९५० साली त्याला नोवेल परितोषिकाचा बहुमानहि मिळाला. पण तो एक दुर्बोध लेखक असल्याने त्याचे साहित्य विशेष लोकप्रिय झाले नाही. एक विश्लेषणात्मक लेखक म्हणूनहि त्याला मान आहे.

फ्रांसोआ मोदियाक हा जरी जुना लेखक असला तरी दुसऱ्या महायुद्धानंतर तो जगप्रसिद्ध झाला. १९५२ साली त्याला नोवेल परितोषिकाचा बहुमान मिळाला. तो एक कॅथलिक लेखक असून मोठा श्रद्धाळू आहे. मनाने तो भावनाशील असल्याने त्याच्या कादंबऱ्या वाचकांच्या मनाची लगेच पकड घेतात. आंग्ल कादंबरीकार ग्रॅहम ग्रिन ह्याच्याप्रमाणे पाप आणि अपराध ह्यांना तो फार महत्व देतो. The River of Fire, Knot of the Viper, The Woman of the Pharisese (ह्या कादंबरीचा मी मराठीत 'मी' ह्या नावाने अनुवाद केला असून, सुरस ग्रंथमालेने तो प्रकाशित केला आहे), वगैरे त्याच्या कादंबऱ्या फार गाजल्या. कादंबरी साहित्याशिवाय त्याने चरित्र, नाटक, आणि निबंध साहित्यहि लिहिले आहे. आंद्रे माल्रो (Andre Malraux) ह्या फ्रेंच कादंबरीकाराचे जीवन वादळी आहे. एखाद्या अद्भुतरम्य कादंबरीतील धाडसांनाहि मागे टाकणारी धाडसे आंद्रे माल्रोच्या जीवनात घडली आहेत. पुराणवस्तु संशोधक म्हणून तो पूर्वेकडील देशात गेला. पण तेथे राजकारणात गुंतला गेला. कुओमिंटांगचा सहकारी चिटणीस, बाराजणांच्या समितीचा एक सदस्य आणि कुओमिंटांगचा प्रापोगांडा कमिश्नर म्हणून त्याने चीनमध्ये काम केले. त्याच्या पहिल्या कादंबऱ्या शांघाय येथील राज्यक्रांतीच्या पार्श्वभूमीवरील आहेत. त्या कादंबऱ्यांबद्दल त्याला Prix-Gocourt हे फ्रेंच साहित्यातील श्रेष्ठ मानचिन्ह मिळाले. चीनमधून परत आल्यावर तो पुराणवस्तु संशोधक म्हणून इराणात आणि अफगाणीस्थानात गेला. अरबस्तानात जाऊन त्याने पुराणोक्त 'शेबा'च्या राणीच्या राजधानीचा शोध लावला. त्यावेळी स्पेनमध्ये यादवी युद्धाचा भडका उडाला. माल्रो राजकीय दृष्ट्या त्यावेळी डाव्या गटाचा असल्याने बऱ्याच युरोपियन लेखकांप्रमाणे त्याने

स्पॅनिश यादवी युद्धात रिपब्लिकनांच्या बाजूने वैमानिक म्हणून भाग घेतला. तेथे तो जबर जखमी झाला. दुसऱ्या महायुद्धांत तो टँक दलात भरती झाला. जर्मनांनी त्याला फ्रान्सच्या पाडावानंतर 'कन्सन्ट्रेशन कँप' मध्ये पाठविले. पण तिथून तो मोठ्या शिताफीने निसटून फ्रेंच गनिमांना जाऊन मिळाला.

माल्रो हा कम्युनिस्ट होता असे सांगतात, पण आज तो कम्युनिझम्‌चा कट्टर विरोधक आहे. १९५८ साली फ्रान्स मध्ये झालेल्या राजकीय स्थित्यंतरात तो उजव्या गटाचा एक पुढारी होता. द गॉल शिवाय फ्रान्सचा तरणोपाय नाही असे मानणारे जे लोक होते त्यात तो एक होता. द गॉल अधिकारावर आल्यावर त्याने त्याला आपला प्रचार आणि सांस्कृतिक कार्याचा मंत्री नेमले. ते मंत्रिपद तो सांप्रत भूषवित आहे.

युद्ध कारणात फ्रान्समध्ये बरेच भूमिगत कादंबरी साहित्य लिहिले गेले पण त्यातील फारच थोडे उल्लेखनीय आहे. ते साहित्य लिहिण्यामागील तळमळ धाडस आणि ईर्षा ह्यामुळे ते लोकप्रिय झाले. Put Out the Light ही एकच दीर्घ कथा अथवा लघु कादंबरी आज लोकांच्या स्मरणात आहे. ती कादंबरी अर्थात टोपण नावाने जरी प्रकाशित झाली असली, तरी प्रख्यात फ्रेंच व्यंग चित्रकार 'जां ब्युलर' (Jean Bruller) ह्याने ती लिहिल्याचे नंतर उघडकीस आले. जर्मनव्याप्त कालात उत्तरफ्रान्समधील लोकांवर जो ताण पडला त्याचे उत्कंठित वर्णन त्या कादंबरीत आले आहे.

पॉल गालिको (Paul Gallico) हा आणखी एक फ्रेंच कादंबरीकार युद्धोत्तर कालात प्रसिद्धीस आला. त्याची Sncw Goose ही कादंबरी फार लोकप्रिय झाली.

जर्मनी

नाझी राजवटीत बहुतेक सर्व मोठे लेखक परागंदा झाले. स्टिफन झ्वाइगने ब्राझिलमध्ये आणि अर्न्स्ट टोलरने स्वित्झरलँडमध्ये आत्महत्या केली. थॉमस मॅन, जर्मनीतून बाहेर पडल्यावर मोठा झाला Dr. Faiist आणि The Magic Mountain ह्या त्याच्या दोन श्रेष्ठ कलाकृति त्याने जर्मनीतून बाहेर पडल्यावर लिहिल्या. त्या दोन्हींनी त्याला प्रचंड कीर्ति मिळवून दिली.

हॅन्स फालाडा जर्मनीतच राहिला, पण तो नाझींच्या वक्रदृष्टीतून सुटला नाही. खुनाच्या आरोपावरून त्याला नाझींनी तुरुंगात टाकले. दोस्तांनी त्याची मुक्तता केली पण तो नंतर फार काळ जिवंत राहिला नाही. त्याची Der Drinker ही कादंबरी त्याने तुरुंगात असताना कोडमध्ये लिहिली व त्याच्या मृत्यूनंतर ती प्रकाशित झाली.

इटाली

इटालीत फॅसिस्ट राजवटीमध्ये बहुतेक सर्व मोठे लेखक परागंदा झाले, जे मागे

राहिले त्यांचे मुसोलिनीच्या हस्तकांनी भयंकर हाल केले. इग्नासिया सिलोने (Ignazio Silone) हा आज इटालीचा सर्वश्रेष्ठ कादंबरीकार म्हणून समजला जातो. सिलोने कम्युनिस्ट होता. तो आणि त्याचा भाऊ दोघे त्रिएस्त शहरात एक मजूर पत्र चालवीत असत. ते पत्र फासिस्टांनी बंद पाडले व सिलोनेच्या भावाला बेदम मार दिला. त्या माराच्या जखमांनी तो मरण पावला. फासिस्ट सिलोनेलाहि ठार मारण्याच्या बेतात होते. पण तो भूमिगत झाला व स्वित्झरलंडमध्ये पळून गेला.

सिलोने कम्युनिस्ट होता हे वर आलेच आहे. पण रशियांतील शुद्धीकरण सत्राच्या वेळी त्याने कम्युनिस्ट पक्षाचा राजिनामा दिला. दुसऱ्या महायुद्धाच्या कालात तो स्वित्झरलंडमध्येच होता. फासिस्टांचा पाडाव झाल्यावर तो आपल्या मायभूमीला परतला. Bread and Wine आणि The Sea Beneath the Snow ह्या त्याच्या दोन श्रेष्ठ कादंबऱ्या आहेत. तो समाजवादी असल्याने मानवी प्रश्नाचा उहापोह तो समाजवादी दृष्टिकोणाने करतो. कार्ल लेव्ही (Carlo Levi) हा आणखी एक कम्युनिस्ट कादंबरीकार आहे. त्याची Christ Stopped at Eboli ही कादंबरी फार गाजली. दुसऱ्या महायुद्धानंतर इटालीमध्ये नव पुनर्जीवनवाद Neo Renaissance ह्या नावाचा एक साहित्य संप्रदाय जन्मास आला. लेव्ही हा त्या संप्रदायाचा अध्वर्यु समजला जातो. हा संप्रदाय मुख्यत्वे डाव्या गटाच्या, विशेषेकरून कम्युनिस्ट मतप्रणालीच्या लेखकांनी सुरू केला असल्याने युरोपियन टीकाकार त्याची दखल घेत नाहीत असे वाटते. कारण The Outline of Literature ह्या सातशे आठशे पृष्ठाच्या ग्रंथात कार्ल लेव्ही आणि त्याचा नव पुनर्जिवनयाद ह्याचा चूकूनहि कुठे उल्लेख आलेला नाही.

The Bicycle Thief हा कादंबरीचा लेखक लुइजी वार्तोलिनी (Luigi Bartolini) आणि The Skin ह्या कादंबरीचा लेखक कुर्झिग्रो मालापार्त (Curzio Malaparte) हे दोघेहि मोठे कादंबरीकार आहेत. (ह्यांचाहि The Outline of Literature मध्ये उल्लेख नाही) बार्तोलिनी हा देखील सुरुवातीला कम्युनिस्ट होता. तो प्रथम चित्रकार होता; नंतर लेखक बनला. मुसोलिनीच्या राजवटीत त्याला भूमध्यसमुद्रातील एका निर्जन बेटावर स्थानबद्ध करून ठेवण्यात आले होते.

युद्धोत्तर कालातील बहुतेक सर्व इटालियन लेखक आणि कवि डाव्या गटाचे होते. आज त्यांच्या मतप्रणालीत बदल झाला आहे की काय ते कळलेले नाही; बहुतकरून झाला असण्याची शक्यता आहे. कारण कम्युनिस्ट पक्षाला इटालीमध्ये आज ओहोटी लागलेली आहे.

★ ★ ★

अनुक्रमणिका

आधुनिकता, गौरपूजा आणि बुद्धिवाद

लेखक नी. र. वऱ्हाडपांडे

माझ्या लहानपणी आमच्या मराठी क्रमिक पुस्तकामध्ये आगरकरांचा एक लेख समाविष्ट केलेला होता. त्याबरोबरच आगरकरांचा एक फोटोही दिलेला होता. तो धडा शिकवतांना आमचे मास्तर म्हणाले, "आगरकरांनी पगडी व आंगरखा असा पोषाख केला आहे. पण यावरून ते सनातनी होते असे समजू नका. ते कट्टे सुधारक होते."

मास्तरांचे हे विधान विशेष काटेकोरपणाने घेतले नाही तर त्यात फारसे आक्षेपार्ह काही नव्हते. पण अनेक समकालीन लेखकांचे वैचारिक लिखाण वाचले म्हणजे मला या विधानाची आठवण होते व या साध्या विधानात किती अनर्थकारक दुर्मते दडलेली असू शकतात हे पाहून आश्चर्य वाटते !

या लेखकांच्या दृष्टीने पोषाख आणि विचारसरणी यांचे फार साम्य आहे. पगडी व आंगरखा हा पोषाख कुणाला कितीहि सोइस्कर व रुबाबदार वाटला तरी आज त्याची फॅशन नसल्यामुळे तसा पोषाख करून हिंडणे तऱ्हेवाईकपणाचे ठरते. त्याचप्रमाणे एखादी विचारसरणी कितीहि सयुक्तिक असली तरी तिची आज फॅशन नसेल तर तिचा आचार वा उच्चार करणे तऱ्हेवाईक व अनिष्ट ठरते. "आधुनिकतेच्या निकषावर सर्व विचार तपासले पाहिजेत" असे, विद्वत्ताप्रचुर लिखाण लिहिणाऱ्या एका लेखकाने म्हटले आहे. अर्थात् त्याच्या मते एखादे मत खरे की खोटे हे ठरवायचे असेल तर ते कितपत "आधुनिक" आहे हे पाहिले पाहिजे.

पण असे खरोखरच करू लागले तर वरील लेखकाला देखील तो प्रकार कितपत पसंत पडेल याची शंकाच आहे. १९५९ साली प्रचारात आलेले सर्व विचार १९५८ साली प्रचारात आलेल्या विचारापेक्षा श्रेष्ठ व १९६० साली प्रचारात आलेले सर्व विचार १९५९ साली प्रचारात आलेल्या सर्व विचारापेक्षा श्रेष्ठ, या तत्वाची हास्यास्पदता विशद करून सांगायची जरूर नाही. या तत्वाप्रमाणे हजारो वर्षांपूर्वी प्रसृत झालेल्या गौतम बुद्धाच्या विश्वबन्धुत्ववादापेक्षा विसाव्या शतकात प्रसृत झालेला हिटलरचा वंशद्वेषवाद अधिक श्रेष्ठ ठरेल.

आधुनिक अज्ञान व जुने विज्ञान

आधुनिकता हा विचारसरणीच्या सत्यतेचा वा श्रेष्ठतेचा निकष होऊ शकत नाही. पण ज्या क्षेत्रात ज्ञानाची सतत प्रगति होत असते व **संशोधनाची परम्परा खंडित झालेली नसते,** त्या क्षेत्रातल्या तज्ज्ञांना पूर्वीच्या तज्ज्ञांना उपलब्ध असलेला सर्व पुरावा व त्यावरील मीमांसा उपलब्ध असतात व त्याशिवाय पूर्वी उपलब्ध नसलेली अशी नवीन प्रयोगाने वा निरीक्षणाने उपलब्ध झालेली नवीन तथ्ये व नवीन तंत्रे देखील त्यांना अवगत असतात. यामुळे त्या क्षेत्रात आधुनिक तज्ज्ञांचे मत प्राचीन तज्ज्ञांपेक्षा अधिक विश्वसनीय मानणे सयुक्तिक असते.

पण ही सयुक्तिकता "संशोधनाची परंपरा खंडित झालेली नाही" या गृहीत कृत्यावर अवलंबून आहे, हे विसरून चालणार नाही. वैज्ञानिक संशोधनाची परंपरा ग्रीसच्या ऱ्हासानंतर युरोपात खंडित झाली व मध्ययुगामध्ये युरोप अज्ञानात राहिला. पृथ्वी सूर्याभोवती फिरते असे ग्रीक ज्योतिर्विदांनी पूर्वीच सिद्ध केले होते तरी पृथ्वी स्थिर आहे हेच मत मध्ययुगात युरोपात सर्वमान्य होते. त्यावेळी हे मत ग्रीक मतापेक्षा जास्त आधुनिक होते. तरी विज्ञानाची परंपराच खंडित झालेली असल्यामुळे ते जुन्या मतापेक्षा जास्त साधार नव्हते. भारतात विज्ञानाची परंपरा गेल्या हजार वर्षात खंडित झालेली आहे व आज देखील एखादा रामन निर्माण झाला तरी विज्ञानाच्या परंपरेचे पुनरुज्जीवन झाले आहे असे म्हणता येत नाही. त्यामुळे आयुर्वेदाची औषधे कोणत्याही बाबतीत आधुनिक औषधापेक्षा जास्त परिणामकारक नाहीत असे काही भारतीय डॉक्टरांचे मत "आधुनिक" असले तरी आयुर्वेदीय औषधावरील संशोधनाच्या अखंड परंपरेवर ते आधारलेले नसल्यामुळे एखाद्या जुन्या वैद्याच्या मतापेक्षा अधिक साधार नाही.

नव्या मतापेक्षा जुनी मते अनेक वेळा अधिक बुद्धिवादी कशी असतात याची कितीतरी उदाहरणे भारताच्या वैचारिक इतिहासातून काढून दाखविता येतील. वेदाचा अर्थ लावू पाहणे पाप आहे असे मत गेल्या दोन तीनशे वर्षात रूढ झाले आहे. पण त्यापूर्वी सायणाने वेदावर भाष्य लिहिले; त्याच्याही पूर्वीचे सुमारे सहाव्या शतकातले एक वेदभाष्य हल्ली उपलब्ध झाले आहे व यास्काने तर वेदपठण करून त्याचा अर्थ न जाणणाऱ्याला भारवाही म्हटले आहे. परधर्मीयांना स्वधर्मात घेणे हा अधर्म आहे असे मत गेली कित्येक शतके प्रचलित आहे पण त्यापूर्वी बुद्धभिक्षूंनी त्रिखंडात संचार करून आपल्या धर्माची पताका फडकविली. परदेशगमन हे पाप आहे असे शंभर वर्षांपूर्वीचे आधुनिक मानत पण उपर्युक्त विश्वसंचारी बुद्धभिक्षूंना व जावा, सुमात्रा इत्यादि बेटात जाऊन साम्राज्ये स्थापणाऱ्या भारतीय खलाशांना या मताचे वारेही लागलेले दिसत नाही. प्रेताची चीरफाड केल्याने मध्ययुगातील उच्चवर्णीय आधुनिकांना विटाळ होत असे पण

त्यांच्यापेक्षा जुनाट असलेल्या सुश्रुताने प्रेताची चीरफाड करणाऱ्या शल्योपचार-विद्येचा प्रचार केला. **आधुनिकत्व व बुद्धिवाद यांचा काही संबंध नाही हे या** उदाहरणांवरून स्पष्ट होते.

विज्ञानाची परंपरा पूर्वी अनेकदा खंडित झाली असेल पण गेल्या चारशे वर्षांत विज्ञान मानवी संस्कृतीत इतके रुजले आहे की आता त्याची परंपरा खंडित होण्याचा संभव नाही व म्हणून अधिक आधुनिक ते अधिक साधार हे समीकरण फारसे चूक ठरणार नाही, असे अनेक लोकांना वाटते. विज्ञानाच्या भवितव्याबद्दल मी एवढा आशावादी नाही. मानवी इतिहासात पूर्वी जे घडले ते पुढे घडणार नाही अशी ग्वाही देणे फारच धोक्याचे आहे. जननशास्त्र, सापेक्षतावाद, सम्भाव्यतेच्या कल्पनेवर आधारलेली सांख्यिकी, व व्यक्तिगत भेदांवर आधारलेली मनोमिति, ही शास्त्रे प्रतिगामी आहेत असा उद्घोष करून त्यांना विज्ञानबाह्य मार्गांनी दडपून टाकण्यात "पुरोगाम्यां"नी बरेच यश मिळविले, ही घटना आपल्या डोळ्यादेखत घडलेली आहे. संघटित अंधश्रद्धांच्या वेदीवर बुद्धिवादाचा बळी देण्याची मानवाची प्रवृत्ति कमी झाली आहे असे दिसत नाही. एका ठिणगीतूनच वणवा पसरतो त्याप्रमाणे या प्रवृत्तीतूनच विज्ञानाला भस्मसात करणारा मानवी अविचाराचा वणवा निर्माण होऊन मानवजात पुनः तमोयुगात लोटली जाणार नाही याचा भरवसा कुणी द्यावा ?

विज्ञानाचे भवितव्य

विज्ञानाच्या भवितव्याबद्दल साशंकता निर्माण करणारे संघटित अंधश्रद्धा हे एकच कारण नाही. संघटित अंधश्रद्धाप्रमाणेच आजच्या युगातला वाढता उपयुक्ततावादे विज्ञानाच्या वाढीस घातक ठरण्याचा संभव आहे. मानवी बुद्धिमत्तेचा अलौकिक विक्रम म्हणून ज्याचे वर्णन करता येईल असे व्याकरण पाणिनीने रचले, ते बुभुक्षितांच्या भुकेची सोय करण्यासाठी नव्हे. त्रिकोणाच्या दोन बाजू मिळून तिसऱ्या बाजूपेक्षा लांब असतात, हे सिद्ध करण्याची पद्धत ग्रीक गणित्यांनी शोधून काढली तेव्हा "गवताच्या भाऱ्याकडे आड मार्गाने न जाता सरळ मार्गाने जाणाऱ्या गाढवालाही जे तत्व माहीत असते ते सिद्ध करण्याचा खटाटोप करून तुम्ही काय मिळवले ?" असा उपयुक्ततावाद्यांनी त्यांचा उपहास केला. पण गाढवाला माहीत असलेली तत्वे देखील प्रमाणाने सिद्ध करता येणे हा व्यर्थ खटाटोप नसून मानवाला कृतकृत्य वाटण्यासारखे त्यात काहीतरी आहे अशीच त्या ज्ञानप्रेमी गणित्यांची धारणा होती.

शुद्ध ज्ञान हेच जीवनातले एक श्रेष्ठ मूल्य आहे, " न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते " या धारणेशिवाय विज्ञानाची प्रगति फार काळ होऊ शकणार नाही. आज ग्रीक गणित्यांचा उपहास करणारा ज्ञाननाशी उपयुक्ततावाद पुनः

अनुक्रमणिका

डोके वर काढत आहे. म्हणून या तत्त्वाचा पुनरुच्चार करणे आवश्यक होऊन बसले आहे. ज्या संशोधनाचा समाजाचे धन वाढवण्यासाठी वा संहारक शस्त्र तयार करण्यासाठी उपयोग होऊ शकत नाही ते संशोधन कुचकामाचे आहे, हे मत हल्ली प्रबळ होत आहे. संस्कृत विद्येचा "जिवास व शरीरास" काही उपयोग नाही, असा लोकहितवादींचा एक मोठा आक्षेप होता. गेल्या तीन चारशे वर्षांतले प्रमुख संशोधक याच मताने ग्रासलेले असते तर युक्लिडेतर भूमित्या, सापेक्षतावाद, विकासवाद वगैरे विज्ञानातील क्रांतिकारक शोध लागलेच नसते. कारण हे शोध लागले तेव्हा त्यांचा "जिवास व शरिरास" काही उपयोग नव्हता. गतिही सापेक्ष आहे की निरपेक्ष आहे, माणूस माकडापासूत झाला की नाही, वगैरे गोष्टींचा काथ्याकूट केल्याने समाज जास्त श्रीमंत वा वलाढ्य होईल, या उद्देशाने आइन्स्टाईन व डार्विन यांनी आपले संशोधन केले नव्हते. (पुढे त्यांच्या संशोधनाचा याही उद्देशाच्या पूर्तीसाठी उपयोग झाला ही गोष्ट वेगळी.) वैज्ञानिक संशोधनाचे मूल्य त्याने सृष्टीचे नियम समजून घेण्यात कितपत मदत झाली यावरून ठरवले पाहिजे. आधुनिक युगात फॅशनेबल होऊ पाहणाऱ्या उपयुक्ततावादापासून वैज्ञानिकांनी सावध राहणे आवश्यक आहे.

नव्या अन्धश्रद्धा

आधुनिक कालात उपयुक्ततावादासारख्या काही विज्ञानविरोधी प्रवृत्ति असतील, पण एकन्दरीत आज पूर्वीच्या कोणत्याही कालापेक्षा विज्ञानाचा प्रभाव जास्त आहे व अंधश्रद्धांचे क्षेत्र आकसलेले आहे. म्हणून बुद्धिवाद व आधुनिकता यांचा संबंध जोडणे गैर नाही, असा एक युक्तिवाद येथे केला जाईल. या युक्तिवादातला दावा खरा असता तर मला त्यात आनंदच वाटला असता, पण तो कितपत खरा आहे याबद्दल मला शंका आहे. पूर्वी कोणत्याही युगात नव्हती एवढी विज्ञानाची आज वाढ झाली आहे हे खरे आहे, पण त्याबरोबर अंधश्रद्धांचीही वाढ त्याच प्रमाणावर झाली आहे असे मला कधीकधी वाटते. पुस्तकातल्या लहानशा नकाशापेक्षा भिंतीवर टांगलेल्या मोठ्या नकाशात भारतातील सुपीक जमिनीचे क्षेत्रफळ अधिक असते त्याचप्रमाणे वाळवंटाचेही क्षेत्रफळ त्याच प्रमाणात मोठे असते !

अन्धश्रद्धा म्हणजे ज्या तत्त्वांच्या सत्यतेबद्दल कसलाच पुरावा नाही त्यांच्या सत्यतेवर अढळ विश्वास ठेवणे. या दृष्टीने पाहू जाता पूर्वीच्या अनेक अंधश्रद्धा नाहीशा झाल्या असल्या तरी त्याच्या जागी पुष्कळ नव्या अंधश्रद्धा निर्माण झाल्या आहेत, असे दिसून येते. मानवाचा सत्य, त्रेता, द्वापार व कली या युगक्रमाने घडलेला इतिहास हा अधोगतीचा इतिहास आहे अशी पूर्वीची कल्पना होती तर

त्याच्या उलट, प्राथमिक समाजशाही, सरंजामशाही व भाण्डवलशाही या क्रमान मानवी समाज प्रगत होत आहे अशी आधुनिक कल्पना आहे. गङ्गेच्या सान्निध्याने आपण पवित्र होऊ अशी जुनी समजूत होती, तर आपली बायको विलायतेत प्रसूत झाल्यास तिचा मुलगा हिरा निपजेल, अशी उमेशचन्द्र बानर्जीसारख्या आधुनिकाची समजूत होती. वेदवाणीच्या उच्चाराने आपल्याला पुण्य लागेल असे जुन्या वैदिकांना वाटत असे तर इंग्रजी भाषा शिकल्याने मनोविकास साधतो, असे अनेक आधुनिक मानतात. रामाच्या वानरसेनेची संख्या आठ पद्म होती असे पूर्वी भाविक हरदास विनादिक्कत सांगत. हे सांगताना साऱ्या जगाची लोकसंख्या देखील आठ पद्माच्या जवळपासही नाही याचा ते विचार करीत नसत. त्याचप्रमाणे "पुरोगामी" लोकहितवादी इंग्रजी भाषेत "कोटचवधि" ग्रन्थ आहेत असे वेलाशक म्हणत. जगातील हजारो भाषातले सर्व वाङमय मिळून फार तर सव्वा कोटीच्या घरात ग्रन्थसंख्या जाईल याची वार्ताही त्यांना नव्हती. अशासारख्या शेकडो उदाहरणांवरून आधुनिकाच्या अन्धश्रद्धांचे विषय बदलले आहेत, अन्धवृत्ति मुळीच नाहीशी झालेली नाही, असे खेदाने म्हणावे लागते.

यद्यदाचरति श्रेष्ठः. !

"आधुनिक अन्धश्रद्धा म्हणून ज्या समजुतीकडे तुम्ही बोट दाखवता त्या चुकीच्या असतील, पण त्यांच्या मुळाशी श्रेष्ठांचे अनुकरण करून आपला उत्कर्ष साधणे ही स्पृहणीय वृत्तिच आहे. गेल्या चार, पाचशे वर्षात ज्ञान, विज्ञान, सामर्थ्य, समृद्धि व कलाकौशल्य या सर्व क्षेत्रात युरोपातील देश आपल्यापेक्षा वरचढ झाले ते त्यांच्या सामाजिक संस्था आपल्यापेक्षा श्रेष्ठ असल्याशिवाय झाले, असे म्हणता येणार नाही. मग त्यांच्यापासून धडे घेण्याच्या वृत्तीला "अन्धश्रद्धा" "गौरपूजा" म्हणून हिणवण्यात काय अर्थ आहे ?" असा यावर युक्तिवाद केला जाईल.

त्यावर उत्तर असे की पाश्चात्य आमच्यापेक्षा सर्व बाबतीत पुढारलेले आहेत म्हणून त्यांच्या सर्वच रूढि व संस्कृतिविशेष आमच्यापेक्षा श्रेष्ठ असले पाहिजेत, हे अनुमान फारच दूरान्वयाचे आहे. कोणत्याही सामाजिक विशेषांचे मूल्यमापन समाजशास्त्राच्या दृष्टीने झाले पाहिजे. तो विशेष इंग्रजांचा की झुलू लोकांचा, हा विचार मूल्यमापनाच्या दृष्टीने अप्रस्तुत आहे. रूढि कोणत्या परिस्थितीत उद्भवली याचा इतिहास, तिच्याविषयी लोकांच्या वृत्ति काय आहेत याचे मानसशास्त्रीय परीक्षण, सांख्यिकी व तर्कशास्त्र यांच्या साहाय्याने तिच्या परिणामांची मीमांसा, वगैरे सर्व प्रकारचे संशोधन हाच एखाद्या रूढीवर मत देण्याचा एकमेव मार्ग आहे. प्रगत राष्ट्रातल्या सर्व रूढि श्रेष्ठ असतात असे समजणे हा बुद्धिवाद नव्हे. इंग्रज लोक सात आठशे वर्षांपूर्वी आपल्यापेक्षा प्रगत

नव्हते. तेव्हा त्यांच्या बहुतेक रूढी आतासारख्या नव्हत्या व आम्ही हजार वर्षापूर्वी जगात अग्रेसर होतो तेव्हा आमच्या बहुतेक रूढि आतापेक्षा वेगळ्या होत्या, असे सिद्ध करता येणार नाही. विवाहपद्धति, जातिभेद, वगैरे आमच्या रूढीमुळे आम्हाला पारतंत्र्य आले असे अव्वल इंग्रजीतल्या सुधारकांना वाटे. "अशा रूढि ब्रह्मदेशात नव्हत्या, उलट सुधारकांना इष्ट अशाच अनेक रूढि तिथे होत्या, असे असून ब्रह्मदेशाला पारतंत्र्य का आले ?" असा प्रश्न लो. टिळक करीत असत. हा प्रश्न मर्मग्राही आहे यात संशय नाही.

प्रगत राष्ट्रांचे सर्वच विशेष अनुकरणीय असतात या ठोकळेबाज वृत्तीचे पर्यवसान मर्कटानुकरणात होते. केमलपाशा हे असल्या मर्कटानुकरणाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. केमलपाशाने फेझ टोपीला बन्दी केली. तुर्की भाषेवर रोमन लिपि लादली वगैरे शतकृत्ये वर्णितांना काही लोकांना गहिंवर येतो. पण फेझ टोपीला बन्दी केल्यामुळे तुर्क लोकांचा कोणता फायदा झाला ? त्यामुळे त्यांची जगातली प्रतिष्ठा वाढली की राष्ट्राच्या परम्परेशी निगडित असलेल्या शिरोभूषणाची लाज मानून आपला हीनतागण्ड त्यांनी जाहीर केला, याचा विचारही या लोकांना शिवत नाही. त्याचप्रमाणे पूर्वी तुर्कस्थानात प्रचलित असलेल्या लिपीपेक्षा रोमन लिपि कोणत्या बाबतीत श्रेष्ठ होती ? ती लादल्यामुळे तुर्की भाषेचा कोणता फायदा झाला ? त्यामुळे तुर्की भाषेचा प्रचार गैरतुर्की मुलखात वाढला काय ? असे प्रश्न केमलपाशाचा कोणताही आदरकर्ता विचारीत नाही. या प्रश्नाचे उत्तर रोमन लिपीला अनुकूल असेल असे मला वाटत नाही. उलट अनेक तुर्की शब्द रोमन लिपीत लिहिता येत नाहीत म्हणून ते शब्दच भाषेतून काढून टाकावेत असा केमलपाशाने हुकूम सोडला होता ! बाळचाला सदरा लांडा होतो म्हणून त्याचे हातच कापा, या तऱ्हेची ही " सुधारणा " आहे.

आणि असल्या 'सुधारणांचा' एवढा खटाटोप करून केमालपाशाने काय साधले ? तुर्कस्थान एवढा 'सुधारलेला' नव्हता तेव्हा एक काळ असा होता की युरोपातील सर्व राष्ट्रे तुर्की तरवारींपुढे चळचळा कापत. आताच्या 'सुधारलेल्या' तुर्कस्थानला युरोपातले एखादे कोकरू तरी दाद देईल काय ?

पाय आणि कुबड्या

केमालपाशासारख्याच 'सुधारणा' भारततही कराव्या, असे काही लोकांचे म्हणणे आहे. ओंकारात काहीतरी दैवी शक्ति आहे असे जुन्या श्रद्धाळूंना वाटत असे. त्याचप्रमाणे रोमन लिपीच्या ए. बी. सी. मध्ये काहीतरी गूढ सामर्थ्य आहे

व आपण आपली जुनीपुराणी नागरी लिपि सोडून रोमन लिपीचा स्वीकार केला तर आपले कल्याण होईल असे त्यांना वाटते. वस्तुतः नागरी लिपी रोमन लिपीपेक्षा अधिक अचूक व नव्हे तर टंकनाला अधिक जलद व आटोपशीर देखील आहे हे प्रयोगांनी सिद्ध झालेले आहे. उदाहरणार्थ, कथा हा शब्द रोमन लिपीत टंकित करायला पाच आघात करावे लागतात तर नागरीत टंकित करायला तीन व आघात करावे लागतात. अमृतसर या शब्दाला रोमनमध्ये आठ आघात करावे लागतात तर नागरीत फक्त सहाच आघात करावे लागतात. नागरी लिपीला जास्त आघात लागतील असे शब्द बहुधा आढळत नाहीत. त्याचप्रमाणे नागरी लिपीत कमी अक्षरांनी काम भागते. रोमन हा शब्द नागरीत तीनच अक्षरांनी लिहिला जातो, उलट रोमनमध्ये Roman असा तो लिहायला पाच अक्षरे खर्ची पडतात. आहे त्या स्थितीत रोमन लिपि वापरण्याची ही अवस्था तर ती नागरीसारखी अचूक करायला आवश्यक असलेली जादा चिन्हे वापरतांना काय गहजब उडेल हे सांगायलाच नको. कथा हा शब्द रोमन लिपीत पुरेशा अचूकपणे लिहायला katha असा लिहावा लागेल. म्हणजे नागरीच्या तीन ऐवजी सहा आघात करावे लागतील! म्हणजे रोमन लिपीत नागरीइतका अचूकपणा आणून ती टंकित करायची म्हटले तर नागरी टंकनापेक्षा दुप्पट वेळ व निदान दीडपट जागा लागेल. असे असून नागरीच्या ऐवजी रोमनचा आग्रह धरणे, धड पायाच्या माणसाने आपले पाय तोडून कुबड्यांच्या आधारारावर चालावे असे म्हणण्या-सारखे आहे. बुद्धिवादाची कास सोडून पाश्चात्यांच्या सर्वच पद्धति चांगल्या, या ढोबळ तत्वाप्रमाणे चालल्यास किती मूर्खपणा पदरी येऊ शकतो, हे लिपीच्या उदाहरणावरून फार चांगले स्पष्ट होते.

★ ★ ★

निर्मळ विचार व शुद्ध दृष्टि यांची आज नितान्त आवश्यकता आहे. येथे अधीरता नको, उताविळी नको, स्वार्थ नको, आळस नको. निर्मळता हवी असेल तर खोल अभ्यासाची आवश्यकता आहे. प्रयत्न व कष्ट यांची जरूर आहे. समाजा-बद्दल प्रेम व कळकळ यांची जरूर आहे. समाजाला सुखी कसे करता येईल, ही तळमळ लागली म्हणजे मग तुम्ही विचार करू लागाल. मग जो विचार स्फुरेल, त्याचा आचार सुरू होईल; आणि या विचाराला व आचाराला 'युगधर्म' असे नाव दिले जाईल.

साने गुरुजी

अनुक्रमणिका

वाटचाल

परतवाड्याचे एक निष्ठावान समाजसेवक आणि कवि श्री. न. रा. धुळधर यांचा 'वाटचाल', हा काव्यसंग्रह जणु परिस्थितीने जर्जर झालेला एक प्रवासी आहे. जीवनाच्या अत्यंत तापदायक उन्हातान्हातून तो कसाबसा पुढे पाऊल टाकीत जात असताना, आपली दु:खद, करुण कहाणी गात आहे. कवीने एकप्रकारे आपल्या तीव्रतर भावभावनांची कैफियत प्रस्तुत काव्यसंग्रहात तळमळीने सादर करून, मनुष्यमात्राच्या कर्तव्याची प्रखर जाणीव करून दिली आहे.

श्री. धुळधरांची कविता अगदी साधी आहे. तिची घडण काय किंवा रंगरूप काय साधेच आहे. स्वत: कवि 'माझी कविता' कशी आहे याबद्दल प्रांजळपणे सांगतात, 'माझी कविता साधी भोळी, नागर नटवी वृत्ति नाही।'.........'नटणे थटणे, मोहक अभिनय, असले चाळे ठाउक नाही।' पण असे काही असले तरी तिचे हृदय उदात्त व विशाल आहे. कवीने रंगल्या गांजलेल्या, श्रमिक व दलित लोकांच्या उद्धारार्थ आपली उत्कट भावना व्यक्त केली आहे. तो तळमळीने उद्गारतो—

जो श्रमला श्रमतो नित्य नव्या
त्या श्रमिका नावच नाही रे !

लौकिकास चढला दुसराची
इतिहासी त्याची विस्मृति रे

तसेच, स्पृश्यांना उद्देशून, कवि विचारतो, 'तू स्पृश्य कसा झाला सांग मजला ? ' आणि मग करडा जाब विचारून 'अस्पृश्यांना निवारा !' या कवितेत तो जनतेला कळवळून विनंती करतो—

शास्त्रात उक्त नाही। कोठेच वाट नाही।
रूढीस घाव घाला। अस्पृश्यता निवारा।।

समाजातील दांभिकपणा, खोटे व्यवहार, अन्यायकारक धोरण, मोठेपणाच्या भ्रामक कल्पना आदि बाबीसंबंधी कवीने तळतळून परामर्श घेतला आहे. आणि मानवतेचा पुरस्कार केला आहे. शेवटी कवि इशारा देतो—

नव क्रांतीची नवीन आशा
दृढ भावाने पुढती रेटा
तयीच शुद्धि येइल यांना
काळाचा जै बसेल रट्टा !

अनुक्रमणिका

श्री. धुळधर यांच्या अशा अनेक भावपूर्ण कविता आहेत. 'सहकार मंत्र घ्यावा' 'देवमंदिरी देव नसे,' 'कां भिक्षा मागत फिरशी ?' 'स्थापीन मराठेशाही,' 'यातच मी मरणार,' इत्यादि कविता विशेष उल्लेखनीय आहेत. श्री. धुळधरांनी आपल्या आयुष्याचा ऐन उमेदीचा काळ स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीत घालविला आहे. त्यावेळी त्यांचे राष्ट्रप्रेम किती उफाळून आले होते, त्यांना आपला देश गुलामगिरीतून नष्ट व्हावा म्हणून कशी तळमळ लागली होती, कारावास पत्करून त्यांनी स्वातंत्र्याप्रीत्यर्थ कसे कष्ट भोगले आणि आपले जीवन किती दुःखमय बनविले. या सर्वांची प्रचीति त्यांच्या प्रस्तुत काव्यसंग्रहाद्वारे येऊन अंतःकरणाला पीळ पडतो. त्यांच्या कवितांची एकूण प्रकृति लक्षात घेतली म्हणजे कवीच्या दुर्धर व भयावह जीवन प्रवासाची स्पष्ट कल्पना येते. आणि म्हणून, १९१८ ते १९५८ या चाळीस वर्षांच्या म्हणजे स्वातंत्र्यापूर्वीच्या व नंतरच्या कालखंडातील कवि श्री. धुळधर यांच्या कविता काव्यतत्वाच्या कसोटीला कितपत उतरतात हे पाहण्यापेक्षा, त्यातील आविष्कृत भावभावनांच्या उदात्ततेकडे सहृदयतेने पाहणेच उचित होईल, असे वाटते.

— ना. रा. शेंडे

वाटचाल: (कवितासंग्रह) —कवि श्री. न. रा. धुळधर; प्रकाशक. श्री. प्र. न धुळधर व श्री. दि. न. धुळधर. मूल्य ३ रुपये.

परीक्षा समितिवृत्त

परीक्षांच्या तारखा व इतर सूचनाः—

(१) परीक्षा दि. २४ आणि २५ सप्टेंबर १९६० रोजी घेण्यात येतील.

(२) परीक्षार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्रे दि. १५ ऑगस्ट १९६० पर्यंत केंद्राधिकाऱ्यामार्फत भरून पाठवावीत.

(३) नवीन अभ्यासक्रमानुसार परीक्षा घेण्यात येतील.

(४) मराठी प्रवेश ते साहित्य स्नातक पर्यंतच्या माहितीपत्रकाला १५ नये पैसे मूल्य आकारण्यात आले आहे.

(५) साहित्य पारंगत परीक्षेच्या अभ्यासक्रमास ५६ नये पैसे मूल्य आकारण्यात आले आहे.

नागपूर
दि. ३०–६–१९६०

तु. वि. गेडाम
संचालक
परीक्षासमिति वि. सा. संघ.

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ याजकडून

सांस्कृतिक कार्यक्रम समितिः—

आषाढशुद्ध प्रतिपदा शनिवार दि. २५–६–१९६० रोजी कविकालिदास स्मृतिदिनानिमित्त 'मेघदूता' वर म. म. डॉ. वा. वि. मिराशी यांचे अध्यक्षतेखाली प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले.

नाट्यसमितिः—

१ जून १९६० रोजी नाटककार कै. श्री. कृ. कोल्हटकर यांची पुण्यतिथि वि. सा. संघाच्या नाट्यसमितितर्फे दरवर्षीप्रमाणे साजरी करण्यात आली. प्रथम अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी प्रतिमेला पुष्पहार घातल्यावर नाट्यसमितीचे आमंत्रक श्री. बाबुराव चिमोटे यांनी भाषण दिले.

वि. सा. संघ भेटः—

मंगळवार दि. १४–६–१९६० रोजी वाशीम येथील वयोवृद्ध कार्यकर्ते व 'वत्सगुल्म माहात्म्य' ह्या ग्रंथाचे निर्माते श्री. शं. गो. ऊर्फ अण्णासाहेब डवीर यांनी वि. सा. संघाला भेट दिली. यावेळी श्री. अण्णासाहेब मालोदे चिटणीस यांनी त्यांना साहित्यमंदिर आणि रंगमंदिर दाखविल्यावर अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी पुष्पमाला घालून श्री. अण्णासाहेबांचे स्वागत केले.

देणगीः—

श्री. शिव जयंति–निमित श्री. य. गो. मालोदे चिटणीस वि. सा. संघ यांनी श्री. शिवाजी महाराजांचा फोटो वि. सा. संघाला भेट म्हणून दिला.

श्री. जिवाजी इस्माईलजी अँड सन्स कॉन्ट्रॅक्टर, साकोली यांनी वि. सा. संघाला रु. २७ ची देणगी दिली.

वरील देणगीदारांचा वि. सा. संघ अत्यंत आभारी आहे.

★ ★ ★

विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने

पुस्तके	रु. पैसे
★ १ निबंध परिमल	२–२५
२ सुमन संचय	१–२५
+ ३ मराठी गद्य	१–५०
+ ४ अंमलदार (नाटक) पु. ल. देशपांडे	२–००
५ भारती (नाटक) नाना जोग	१–५०
६ हिंदी मराठी भाषा प्रवेशिका–मालतीबाई श्रीखंडे	०–७५
७ कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह भाग २	३–००
८ The Vedasthana or The Ancient Home of the Indo-Aryans-(पूर्ण ग्रंथ) ले. कै. डॉ. तु. ज. केदार	३–००
९ „ „ (केवळ भाग ४)	१–५०
१० डॉ. केदार यांचे चरित्र --ले. ज. रा. जोशी	५–००
११ नाट्यमहोत्सव विशेषांक	३–००

कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध

१२ वाग्वैजयंतीचे पुनर्मूल्यन —डॉ. मा गो. देशमुख	०–३१
१३ नाटककार गडकरी —द. रा. गोमकाळे	०–३१
१४ गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार--कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०–५०
१५ गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत —प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
१६ सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल —द. वि. तेंडूलकर	०–५०
१७ गडकऱ्यांची खरी भूमिका —प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
१८ गडकऱ्यांची नाट्यशैली —प्रा. रु. पा. पांजणकर	०–५०

१९ "युगवाणी" मासिक —वार्षिक वर्गणी रु. ५ (वि. सा. संघाचे मुखपत्र)

★ ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार नागपूर प्रकाशन, नागपूर यांचेकडे आहेत.

+ ह्या पुस्तकांचे विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत.
बाकीची सर्व पुस्तके वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १ या पत्त्यावर मिळतील.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ
१९५९–६० चे वार्षिक कार्यवृत्त

प्रास्ताविक–

घटनेप्रमाणे विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९५९ पासून सुरू झाले. १९५९ ते १९६२ या काळाकरिता नवीन निवडून आलेल्या केन्द्रीय कार्यकारी मंडळाचे संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांना पूर्वाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी दि. १ एप्रिल १९५९ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेत संघाध्यक्ष पदाचा कार्यभार प्रदान केला.

१९५९ ते ६२ या तीन वर्षांच्या कार्याच्या दृष्टीने निरनिराळ्या समित्यांची निवड यापूर्वीच म्हणजे दिनांक ८–३–१९५९ रोजी भरलेल्या कार्यकारिणीच्या सभेत करण्यात आली होती.

ह्यावर्षी साधारण सभेच्या दोन आणि केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या सहा सभा झाल्या.

विशेष उल्लेखनीय कार्य–

१९५९–६० मधील विशेष कार्य म्हणून पुढील कार्याचा उल्लेख करता येईल.

"श्री वेहेरे व्याख्यानमाला" आणि "श्री गणेश व्याख्यानमाला" ह्या दोन व्याख्यानमाला यंदा सुरू करण्यात आल्या. ह्याकरिता अनुक्रमे वेहेरे कुटुंबियांनी व एका अनामिक भगिनीने प्रत्येकी रु. ६००० ची देणगी देऊन वि. सा. संघास उपकृत केले आहे. तसेच, वक्तृत्वोत्तेजक सभा, पुणे या संस्थेच्या वतीने "आंतर-महाविद्यालयीन कै. न्या. मू. रानडे वादस्पर्धा" आयोजित करण्यात आली. यु. एस्. आय्. एस् या संस्थेतर्फे "डान्स ज्युबिली" चा कार्यक्रम आणि ब्रिटिश कौन्सिलच्या ("प्ले हाऊस") नाटक कंपनीच्या वतीने पाश्चात्त्य नाटककाराच्या नाटकांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. नागपुरातील हौशी कलावंतांनी निर्माण केलेली "रंजन कला मंदिर" ही संस्था वि. सा. संघाची संलग्न संस्था झाली. वि. सा. संघाच्या नाट्यसमितीच्या वतीने "बाल नाट्योत्सवाचा" अभिनव कार्यक्रम करण्यात आला. तसेच नाट्य–शिक्षणाचे शिबिरहि चालविण्यात आले. ह्यावर्षी विदर्भ साहित्य संघाच्या इमारतीचे दर्शनी भागाचे प्लास्टरिंगचे काम पूर्ण करण्यात आले.

ह्यावर्षी अकोला, सावरगावडुकरे या गावी वि. सा. संघाच्या नवीन शाखा स्थापन करण्यात आल्या.

सभासद–

चालू वर्षी वि. सा. संघाचे एकूण १०४३ सभासद होते. त्यात एकूण १७५ आजीव सभासद असून त्यापैकी ४ उपकर्ते, ६ आश्रयदाते, २ सहाय्यक आणि ४ हितचिंतक आहेत.

समित्यांचे कार्य–

विदर्भ साहित्य संघाचे कार्य प्रामुख्याने भिन्नभिन्न समित्यांच्या द्वारे चालते. चालू वर्षी, निरनिराळ्या समित्यांनी पुढीलप्रमाणे अतिशय उत्साहपूर्वक कार्य केले आहे.

१. सांस्कृतिक कार्यक्रम समिति– (आमंत्रक श्री. य. गो. मालोदे)

(अ) दि. ९–५–५९ रोजी कै. रविंद्रनाथ ठाकूर आणि श्रीशिवजयंती समारोह साजरा करण्यात आला.

(आ) कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला– या व्याख्यानमालेचे उद्घाटन दि. ३–७–५९ रोजी इतिहास संशोधक म. म. द. वा. पोतदार यांचे हस्ते करण्यात आले. या मालेत 'युगपुरुष शिवाजी' ह्या विषयावर तीन व्याख्याने झाली.

(इ) दुसरी व्याख्यानमाला दि. १७, १८, १९ जानेवारी ६० ला झाली. महाराष्ट्रातील श्रेष्ठ साहित्यिक आणि थोर तत्वचिंतक श्री. पु. य. देशपांडे यांनी "आधुनिक विज्ञान आणि वैदिक दर्शनशास्त्र" ह्या विषयावर व्याख्याने दिली. समारोपाचे दिवशी मुंबई राज्याचे राज्यपाल परमश्रेष्ठ श्री. श्रीप्रकाश यांनी अध्यक्ष-स्थान मंडित केले होते. राज्यपालांनी व्याख्यानमालेचा उत्कृष्टपणे समारोप केला.

(ई) दि. २६–५–५९ ला सुप्रसिद्ध गोवासत्याग्रही सौ. आशाताई फडके यांचे काव्यगायन.

(उ) दि. २८–५–५९ ला कै. बाळशास्त्री जांभेकर पुण्यतिथि: वक्ते प्रा. या. मु. पाठक.

(ऊ) दि. १९–७–५९ ला व्यासपौर्णिमेनिमित्त "संशोधनशास्त्र" ह्या विषयावर श्री. अप्रबुद्ध पाळेकरांचे व्याख्यान.

(ए) दि. २५–७–५९ ला लो. टिळक जयंतीनिमित्त साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांचे व्याख्यान.

शारदोत्सव–

(ऐ) दि. ८–१०–५९ रोजी सरस्वती उत्सवाच्या उद्घाटनानिमित्त "साहित्य सौंदर्य आणि जीवन" या विषयावर साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांचे व्याख्यान.

दि. १२–१०–५९ ला "भारतीय कुटुंबसंस्थेचे भवितव्य" या विषयावर सामूहिक चर्चा.

दि. १४–१०–५९ ला कविसंमेलन– उद्घाटक श्री. आनंदराव टेकाडे; अध्यक्ष, श्री. वसंतराव सवनीस.

पुढील कवींनी या संमेलनात भाग घेतलाः–

सर्वश्री. आनंदराव टेकाडे, वसंतराव सवनीस, व. कृ. वऱ्हाडपांडे, कृ. मु. उजळंबकर, मधु कोसारे, श्याम सोनारे, वा. रा. पाठक, सौ. उषाताई लिमये, सौ. शांताबाई दंडिगे, कु. आशा लिमये, व कु. दुर्गा कानगो.

(ओ) **म. ज्योतिबा फुले पुण्यतिथि–** दि. २८–११–५९ रोजी सुप्रसिद्ध कादंबरीकार, टीकाकार आणि पत्रपंडित श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली व्याख्यान.

(औ) **डान्स ज्युबिली–** अमेरिकेचे अध्यक्ष श्री. आयसेनहॉवर यांच्या सांस्कृतिक कार्यक्रम योजनेखाली भारतात आलेल्या रॉड अलेक्झांडर यांच्या जगप्रसिद्ध डान्स ज्युबिली कलापथकाचे दोन कार्यक्रम दि. २८ व २९ नोव्हेंबर ५९ रोजी रात्री ९ वाजता वि. सा. संघाचे धनवटे रंगमंदिरात करण्यात आले.

दि. २९–११–५९ ला दुपारी ३–३० वाजता डान्स ज्युबिली कलापथकातील सर्व कलावंतांचा वि. सा. संघातर्फे सन्मान करण्यात आला. सुरुवातीला भारतीय नृत्य व संगीत यांचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. त्यात पुढील कलाकारांनी भाग घेतला.

भावगीत– कु. कुमुद मोवे; शास्त्रीय संगीत– प्रा. अ. के. कोकजे.

मणिपुरीनृत्य– कु. उषा जगन्नाथन, कु. सुजाता सरमन, कु. जोस कोतवाल.

वाद्यवृंद– कलाकुंज, नागपूर.

कोरकुनृत्य– लेडी अमृताबाई डागा कॉलेजमधील विद्यार्थिनींनी सादर केले.

महाभारत व्याख्यानमाला– तिसरी

(अं) साहित्याचार्य श्री. वाळशास्त्री हरदास यांनी "श्रीकृष्णाचे शाश्वत तत्वज्ञान" या विषयावर दि. १ ते १० फेब्रुवारी ६० पर्यंत "महाभारत व्याख्यान-मालेतील तिसरी व्याख्यानमाला गुंफली.

ब्रिटिश कौन्सिलची नाटके––

(अः) ऑक्स्फर्ड प्लेहाऊस कंपनीच्या वतीने दि. २७ डिसेंबर, २८ डिसेंबर आणि २९ डिसेंबर ५९ रोजी "ट्वेल्थ नाईट" "मॅन ऑफ–डेस्टिनी" "डॉन ज्ञॉन इन हेल" ह्या नाटकांचे प्रयोग वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात करण्यात आले.

अनुक्रमणिका

२ रंगमंदिर समिति– (आमंत्रक १ डिसेंबर १९५९ पर्यंत श्री. श्री. गु अण्णिगेरी: ९–१२–५९ पासून श्री. पु. दि. ढवळे.)

कै. चंद्रभागाबाई पारधी सभागृहाचे उद्‌घाटन— डॉ. का. मो. पारधी सेवानिवृत्त सिव्हिल सर्जन, ब्रह्मदेश यांनी दिलेल्या ५००० रु. च्या देणगीतून धनवटे रंग मंदिरात बांधल्या गेलेल्या एका दालनाला "कै. चंद्रभागाबाई पारधी सभागृह" असे नाव देण्यात आले. या सभागृहाचे उद्‌घाटन दि. ४–११–५९ रोजी सकाळी ८–३० वाजता डॉ. भवानीशंकर नियोगी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. का. मो. पारधी, त्यांचे वडील कै. मो. ग. पारधी, मातोश्री कै. चंद्रभागाबाई पारधी व पत्नी सौ. सुशीलाबाई पारधी या सर्वांच्या तैलचित्रांचे अनावरण करण्यात आले. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे व उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी भाषणे केली.

३ पुस्तकालय समिति– (आमंत्रक श्री. गो. स. देहाडराय)

ग्रंथालयाला यावर्षी खालील प्रमाणे देणग्या मिळाल्या.

(अ) न्या. मू. के. तु. ऊर्फ अण्णासाहेब मंगळमूर्ति, कार्यकारी विश्वस्त वि. सा. संघ यांनी ग्रंथालयाला २३० पुस्तकांची देणगी दिली.

(आ) महाराष्ट्र कार्यालयाकडून सत्यकथा, मनोहर, गॅझेट आदि मासिकांचे अदमासे २०० दुर्मिळ अंक.

(इ) श्री. दि. प्र. ओगले, नागपूर यांचेकडून 'लाईफ' चे काही सुटे व काही बाईंड केलेले अंक.

(ई) प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांचेकडून 'महानुभाव तत्वज्ञान' या ग्रंथाचे हस्तलिखित आणि स्त्री व किर्लोस्कर मासिकांचे बांधणी केलेले २४ अंक.

(उ) श्री. ब. ग. उर्फ अण्णासाहेब खापर्डे अमरावती यांचेकडून "अस्तोदय" "नवा बंगला" आणि "सत्याग्रह" या तीन नाटकांची मूळ हस्तलिखिते.

या वर्षी पुस्तकालय समितीने ग्रंथालयातील पुस्तकांचा संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग व्हावा याकरिता ग्रंथालयाला योग्य स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. लवकरच संदर्भ ग्रंथ म्हणून सर्वांना त्या पुस्तकांचा फायदा घेता येईल अशी आशा आहे.

४. गडकरी स्मारक समिति– (आमंत्रक श्री. र. वि. कुळकर्णी)

कै. राम गणेश गडकरी यांचा ४१ वा स्मृतिदिन समारंभ दि. २१ ते २३ जानेवारी १९६० पर्यंत आयोजित करण्यात आला. यावेळी दि. २१ ते २३ जानेवारी ६० पर्यंत "गडकऱ्यांच्या नाटकातील प्रणयसृष्टि," "गडकऱ्यांच्या

नाटकातील वाक्मृष्टि " आणि "गडकरी काल आणि कर्तृत्व" या विषयांवर सुप्रसिद्ध ग्रंथकार प्रा. डॉ. रा. शं. वाळिंबे यांची व्याख्याने झाली.

दि. २५–१–६० रोजी सावनेर मुक्कामी कै. राम गणेश गडकरी यांचा ज्या घरात मृत्यु झाला त्या ठिकाणी एक सभा घेण्यात आली. यावेळी वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे व्याख्यान झाले. कै. राम गणेश गडकरी यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून श्रद्धांजलि अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमासाठी नागपूरहून श्री. ना. रा. शेंडे, श्री. र. वि. कुळकर्णी, आमंत्रक, ग. स्मा. समिति; श्री, पां, बा. गडकरी, आणि श्री. प्रभाकर गडकरी ही मंडळी गेली होती.

५. नाट्यसमिति — (आमंत्रक श्री. बाबुराव चिमोटे)

(अ) दि. १–६–५९ रोजी कै. श्री. कृ. कोल्हटकर यांची पुण्यतिथि प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांचे अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली. यावेळी श्री. द. रा. गोमकाळे, सि. जज्ज वाशीम यांचे व्याख्यान झाले.

(आ) दि. २६–८–१९५९ रोजी नाट्याचार्य श्री. कृ. प्र. खाडीलकर यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी नाटककार श्री. वा. वा. भोळे यांचे "खाडिलकर आणि मराठी नाट्यकला" या विषयावर भाषण झाले.

(इ) दि. १३–१–६० रोजी सुप्रसिद्ध नाटककार व खासदार श्री. भा. वि. वरेरकर यांचे 'भारतीय रंगभूमि' ह्या विषयावर व्याख्यान झाले.

बालनाट्योत्सव कार्यक्रम––

(इ) लहान लहान मुलांना चांगले वळण लागावे, अभिनय कलेची माहिती व्हावी, सभाधीटपणा यावा, अभिरुचि वाढावी, नाट्यकलेची माहिती व्हावी इत्यादि गोष्टी लक्षात घेऊन हा बालनाट्योत्सवाचा उपक्रम वि. सा. संघाच्या नाट्यसमितीने यंदा नव्याने सुरू केला.

या बालनाट्योत्सवाचे उद्‌घाटन दि. ३१. १. ६० रोजी मुंबई राज्याचे समाजकल्याणमंत्री श्री. ना. खं. तिरपुडे यांचे हस्ते करण्यात आले. हा उत्सव दि. ३१–१–६० दि. १. २. ६० या दोन दिवशी घेण्यात आला. या नाट्योत्सवात रंजन कला मंदिर, कलाभारती, सोमलवार हायस्कूल, सी. पी. अँड बेरार हायस्कूल, लोकांची शाळा, या संस्थांनी आपले चमू पाठवून उत्साहाने भाग घेतला. दि. ३–११–६० ला चार नाटके व दि. १–२–६० ला तीन नाटके आणि पाच नाट्यछटा सादर करण्यात आल्या होत्या.

दि. १–२–६० रोजी कार्यक्रमानंतर निकाल जाहीर करण्यात आला. नागपूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वि. भिं. कोलते यांच्या हस्ते बक्षिस समारंभ झाला. पुढील उमेदवारांना बक्षिसे देण्यात आली.

नाटक— पहिले वक्षिस– " नवे नाटक जुना गोंधळ "
सादरकर्ते– कलाभारती नागपूर

दुसरे वक्षिस– " नाटकाचे नाटक " सादरकर्ते– लीला जोशी व चमू, नागपूर.

तिसरे वक्षिस– " चिडीचा गुलाम " सादरकर्ते– रंजनकला मंदिर, नागपूर.

सर्वोत्तम नाट्यप्रयोगासाठी रंजनकला मंदिरातर्फे ठेवण्यात आलेला फिरता करंडक " कलाभारती " या संस्थेला देण्यात आला.

दिग्दर्शन—

पहिले वक्षिस– श्री. गणेश सोळंकी (नवे नाटक जुना गोंधळ)
दुसरे वक्षिस– कु. लीला जोशी (नाटकाचे नाटक)
तिसरे वक्षिस– कु. नलिनी लोहारकर (चिडीचा गुलाम)

अभिनय—

पहिले वक्षिस– श्री. रंजन दारव्हेकर,
दुसरे बक्षिस– श्री. अशोक तांत्रे व श्री. जगदीश सुकळीकर
तिसरे बक्षिस– कु. ज्योति मोघे

नाट्यछटा—

पहिले वक्षिस– कु. उषा लोहारकर
दुसरे वक्षिस– श्री. अशोक मावकर
तिसरे वक्षिस– श्री अशोक झाडे

खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धा–

यावर्षी दरवर्षीप्रमाणे वि. सा. संघातर्फे "खोलकुटे ढाल" नाट्यस्पर्धा घेण्यात आली. यंदा नागपूर महाविद्यालयाने " खोलकुटे ढाल " मिळविली. दि. ३१–१–६० रोजी रात्रौ वालनाट्योत्सव उद्घाटनप्रसंगी माननीय श्री. ना. खं. तिरपुडे, समाजकल्याणमंत्री यांचे हस्ते " ढाल " देण्याचा समारंभ झाला

शासकीय नाट्यकला प्रशिक्षण वर्ग—

मुंबई राज्याच्या विदर्भ विभागीय शिक्षणखात्याचे वतीने प्राथमिक शिक्षकांना नाट्यकलेचे शिक्षण देण्यासाठी एक नाट्यशिविर आयोजित करण्याची जवावदारी वि. सा. संघाच्या नाट्यसमितीकडे सोपविण्यात आली. त्यानुसार दि. २०-१-६० ते दि. ३–२–६० पर्यंत वि. सा. संघाचे कै. गडकरी स्मारक सभागृहात वर्ग घेण्यात आले. या वर्गाचे उद्घाटन दि. २०–१–६० रोजी संघाध्यक्ष

श्री. ना. रा. शेंडे यांचे हस्ते करण्यात आले. या नाटचकलेच्या वर्गाला नागपुरा-तील नाटचक्षेत्रातील तज्ञ सर्वश्री वा. वा. भोळे, श्री. ना. वनहट्टी, शं. वा. शास्त्री. सखारामपंत जोशी, बाळासाहेब भावे, वसंतराव सवनीस, मनोहरपंत परांजपे, मनोहर कुंडले, गोविंद रत्नपारखी, दि. ब. पंडित, पु. व्यं. दारव्हेकर, शंकरराव कुळकर्णी आणि राजा पाठक यांनी शिकविण्याचे कार्य केले. वर्गाचे संचालन श्री. बाबुराव चिमोटे यांनी अत्यंत उत्साहाने व परिश्रमपूर्वक केले.

दि. २५–१–६० रोजी शिक्षणखात्याचे संचालक डॉ. आ. ग. पवार यांनी प्रशिक्षण वर्गाला भेट देऊन रात्रौ ८–३० वाजता वि. सा. संघ. धनवटे रंग–मंदिरात विद्यार्थ्यांसमोर नाटचकलावर्गाच्या आयोजनाविषयी उद्बोधक व्याख्यान दिले.

दि. २६–१–६० रोजी सकाळी वर्गातील विद्यार्थी आणि शिक्षक वर्ग यांचे डॉ. आ. ग. पवार यांचे समवेत छायाचित्र काढण्यात आले.

दि. ३–२–६० रोजी हडस हायस्कूलच्या ‘खरे सभागृहा’त नाटचवर्गाचा समारोप श्री. प्रो. अ. वंवावाले, उपसंचालक, शिक्षणविभाग (विदर्भ) नागपूर यांचे अध्यक्षतेखाली झाला.

६. युगवाणी समिति (संपादक–एप्रिल ते आक्टोबर–प्रा. या. मु. पाठक; नंतर–श्री. पु. य. देशपांडे)

या वर्षी युगवाणीचे एकूण आठ अंक व त्यात तीन जोड अंक काढण्यात आले. वि. सा. संघाच्या वार्षिक संमेलनप्रसंगी फेब्रुवारी ६० मध्ये संमेलनविशेषांक प्रसिद्ध करण्यात आला.

७. सामाजिक शास्त्रसमिति– (आमंत्रक प्रा. ग. प्र. पिंपरकर)

शारदोत्सव प्रसंगी "भारतीय कुटुंबसंस्थेचें भवितव्य" या विषयावर सौ. विमलाबाई देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली सामूहिक चर्चेचा कार्यक्रम झाला. या चर्चेत सर्वश्री प्रा. प्र. ज. जागीरदार, शरच्चंद्र धर्माधिकारी; वसंतराव साठे, प्रा. ग. रा. पेंढरकर, प्रा. श्री. गो. काशीकर, दे. गो. लांडगे, प्रभु ठोंबरे, व प्रा. ग. प्र. पिंपरकर यांनी भाग घेतला. ही चर्चा उद्बोधक ठरली.

८. परीक्षा समिति– (संचालक–प्रा. तु. वि. गेडाम)

अ–मराठी भाषिकांना मराठीची ओळख करून देण्यापासून एम्. ए. समकक्ष साहित्य पारंगत परीक्षेपर्यंत विविध परीक्षा दरवर्षी दोनदा घेण्यात येतात. प्रस्तुत वर्षी निरनिराळचा परीक्षांना पुढीलप्रमाणे विद्यार्थी बसले.

अनुक्रमणिका

सप्टेंबर १९५९ सत्र परीक्षा केंद्रे–२७		फेब्रुवारी सत्र १९६० परीक्षा केंद्रे–२५	
परीक्षा	विद्यार्थी	परीक्षा	विद्यार्थी
प्रवेश –	७६	प्रवेश–	३२
प्रारंभ–	१२१	प्रारंभ–	१७०
विनीत–	१८८	विनीत–	१३५
परिचित–	५३	परिचित–	३०
स्नातक–	२६	स्नातक–	१०
पारंगत–	५		

सा. विनीत परीक्षेत सप्टेंबर १९५९ च्या सत्रात प्रथम क्रमांक आल्यावद्दल श्री. मनोहर माकोडे, कोंढाळी केंद्र यांना कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक मिळाले.

सत्कार––

(अ) संगीत चूडामणि श्री. विनायकवुवा पटवर्धन यांचा दि. ३–४–५९ ला सत्कार. यावेळी त्यांचे सुश्राव्य गायन झाले.

(आ) दि. १३–१२–५९ ला संघाचे पूर्वाध्यक्ष आणि थोर साहित्यिक व तत्वचिंतक श्री. पु. य. देशपांडे यांच्या षष्ठयब्दिपूर्तीनिमित्त वि. सा. संघातर्फे न्या. मू. अण्णासाहेव मंगळमूर्ति का. विश्वस्त यांचे अध्यक्षतेखाली सत्कार. यावेळी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. गोपाळराव पाठक, श्री. ना. रा. शेंडे श्री. श्री. गो. काशीकर आदींची भाषणे झाली.

(इ) पंजावचे राज्यपाल व सुप्रसिद्ध साहित्यिक माननीय श्री. न. वि. ऊर्फ काकासाहेव गाडगीळ यांची दि. २०–१–६० रोजी भेट.

(ई) मुंवई राज्याच्या शिक्षण खात्याचे संचालक डॉ. आ. ग. पवार यांची दि. २०–२–६० रोजी भेट.

(उ) नागपूर विद्यापीठाची डी. लिट्. पदवी आणि साहित्य अकादमीचे मराठीचे पारितोषिक हे दोन्हीही वहुमान प्राप्त केल्यावद्दल विदर्भातील साहित्यिक आणि संस्कृतज्ञ प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचा दि. ३–३–६० रोजी सत्कार. त्यावेळी प्रा. काशीकर, ग. त्र्यं. माडखोलकर, पु. य. देशपांडे, डॉ. य. खु. देशपांडे यांची भाषणें झाली.

(ऊ) नागपुरातील थोर तपस्वी, विद्वान व साक्षात्कारी पंडित श्री. अप्रबुद्ध तथा अण्णासाहेव पाळेकर यांचा दि. १०–३–६० रोजी सत्कार. याप्रसंगी श्री. मालोदे, श्री. भवानीशंकर नियोगी, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. वर्णेकर, साहित्याचार्य वाळशास्त्री हरदास यांची भाषणे झाली.

अनुक्रमणिका

माननीयांच्या भेटी—

(अ) दि. १३–४–५९ रोजी म. म. द. वा. पोतदार यांची भेट.

(आ) दि. १५–५–५९ रोजी श्री. पु. भा. भावे आणि सौ. वसुंधराबाई पटवर्धन यांची भेट.

(इ) दि. ८–८–५९ रोजी माजी शिक्षणमंत्री श्री. गोपाळराव एकबोटे (हैद्राबाद) आणि मराठवाडा विद्यापीठाचे मराठीचे प्रमुख प्रा. रा. ब. माढेकर यांची भेट.

(ई) दि. २०–८–५९ रोजी मुंबई मराठी साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. न. र. फाटक आणि तर्कतीर्थ श्री. रघुनाथशास्त्री कोकजे यांची भेट.

(उ) दि. १–९–५९ रोजी सावंतवाडीचे महाराज श्री. शिवरामराजे भोसले व अ. भा. गांधर्व महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रा. बा. र. देवधर यांची भेट.

(ऊ) दि. १९–१२–५९ रोजी 'दाजी'चे सुप्रसिद्ध लेखक श्री. ना. धों. ताम्हणकर यांची भेट.

(ए) दि. ३–१–६० रोजी तुळजापुर येथील उस्मानाबाद जिल्हा साहित्य–संमेलनाचे अध्यक्ष श्री. प्रा. भगवंतराव देशमुख यांची भेट.

(ऐ) दि. १०–१–६० रोजी श्रीमती बकुळाबाई अभ्यंकर पुणे यांची भेट.

(ओ) दि. २४–२–६० रोजी वि. सा. संघाच्या बावीसाव्या साहित्य-संमेलनाचे स्वागताध्यक्ष व एक थोर सामाजिक कार्यकर्ते श्री. संतोषराव पाटील, (सावरगाव डुकरे) आणि सुप्रसिद्ध साहित्यिक व कवि श्री. वि. द. घाटे यांची भेट.

(औ) दि. २६–२–६० रोजी खासदार म. म. पां. वा. काणे. व मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति श्री. पटवर्धन यांची भेट.

(अं) मध्यप्रदेशाचे राज्यपाल माननीय श्री. ह. वि. पाटसकर यांनी दि. ८–३–६० रोजी भेट दिली. यावेळी अल्पोपहाराचा कार्यक्रम आयोजित केला होता.

(अः) सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. गो. नी. दांडेकर यांची दि. २२–३–६० रोजी भेट.

निरोप समारंभ— रंगमंदिर समितीचे चिटणीस श्री. श्री. गु. तथा बाळासाहेब अण्णिगेरी हे व्यवसायानिमित्त नागपूर सोडून जाणार असल्यामुळे त्यांना वि. सा. संघातर्फे थाटाने निरोप देण्यात आला. यावेळी श्री. ना. रा. शेंडे संघाध्यक्ष, यांनी श्री. अण्णिगेरी, आणि सौ. शांताबाई अण्णिगेरी यांना पुष्पहार घालून सत्कार केला. अल्पोपहारानंतर श्री. अण्णिगेरी यांनी भाषण केले.

अनुक्रमणिका

विदर्भ पूरग्रस्त सहाय्यक निधीला मदत--

विदर्भीय जनतेला ओल्या दुष्काळामुळे ओढवलेल्या दुर्धर आपत्तीला तोंड देता यावे म्हणून सरकारने निरनिराळे मनोरंजक कार्यक्रम ठेवून निधि जमविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्या निधीला मदत म्हणून वि. सा. संघाने आजपर्यंत ५७५ रुपयांची मदत दिली.

दुखवट्याच्या सभा—

दि. ५–१२–५९ रोजी वि. सा. संघ आणि विदर्भ संशोधन मंडळ यांचे-वतीने कै. डॉ. गो. स. सरदेसाई आणि डॉ. अनंत सदाशिव अळतेकर यांच्या दुःखद निधनाबद्दल दुखवटयाची सभा झाली. यावेळी श्री. ना. रा. शेंडे, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. वा. वि. मिराशी, व श्री. दे. गो. लांडगे यांनी भाषणे करून श्रद्धांजलि अर्पण केली

दि. ९–१२–५९ रोजी वि. सा. संघाचे दाते डॉ. का. मो. पारधी यांच्या निधनानिमित्त दुखवटयाची सभा झाली. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी श्रद्धांजलि अर्पण केली.

दि. ११–१२–६० रोजी वि. सा. संघाच्या नाटयसमितितर्फे नटवर्य श्री. चिंतामणराव कोल्हटकर आणि रेजिसॉर श्री. पार्श्वनाथ अळतेकर यांच्या निधनानिमित्त दुखवटयाची सभा झाली. यावेळी सर्वश्री ना. रा. शेंडे, वा. वा. भोळे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व बाबुराव चिमोटे यांनी श्रद्धांजलि अर्पण केली.

शाखांचे कार्य—

खामगाव शाखा–

खामगांव शाखेची वार्षिक निवडणूक दि. ४–८–५९ रोजी होऊन त्यात नवीन वर्षाकरिता पदाधिकारी निवडण्यात आले.

कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या स्मारकासाठी निरनिराळे कार्यक्रम करून निधि जमविण्याचा प्रयत्न खामगाव शाखेने सुरू केला.

मेहकर शाखा--

मेहकर (जि. बुलढाणा) येथे विदर्भ साहित्य संघाची दि. १३–९–५९ रोजी शाखा स्थापन करण्यात आली. याचवेळी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

वणी शाखा--

दि. १३-१०-५९ रोजी श्रीमंत धोंडो दिनकर उर्फ अण्णासाहेब देशमुख यांचे हस्ते वार्षिक कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी श्री के. ना. काटपाताळ यांनी प्रास्ताविक भाषण करून शाखेच्या कार्याची माहिती दिली. त्या दिवशी रात्री नागपूरच्या सौ. ताराबाई देशपांडे यांचा शास्त्रोक्त व भावगीत गायनाचा कार्यक्रम झाला.

वर्धा शाखा--

दि. २५-९-५९ रोजी वार्षिक सभा होऊन नवीन वर्षाकरिता पदाधिकारी निवडण्यात आले.

दि. १-१०-५९ ते ९-१०-५९ पर्यंत इतर संस्थांच्या सहकार्याने एक नवरात्र व्याख्यानमाला आयोजित केली. या व्याख्यानमालेत पुढील वक्त्यांची भाषणे झाली.

श्री. शं. ग. सुरडकर, वर्धा	– "संस्कृतीचे जीवनात स्थान" दि.१-१०-५९
प्रा. कुसुम नांदे, अकोला	"समर्थ रामदास व त्यांचे सावधपण" दि. २-१०-५९
न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति, नागपूर	"आपले आजचे शिक्षणात चुकते काय कुठे ?" दि. ३-१०-५९
प्रा. शांताराम करकरे, नागपूर	"फ्रॉइडचे मानसशास्त्र"– दि. ४-१०-५९
प्रा. एस. के. लिमये, नागपूर	"संस्कृत साहित्यातील काही व्यक्तिरेखा" दि. ५-१०-५९
प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे, नागपूर	"ज्ञानेश्वरी" दि. ६-१०-५९
श्री. दि. ब. पंडित, नागपूर	"शब्दशक्ति व शब्दसौंदर्य" दि.७-१०-५९
प्रा. अकोलकर, चांदा	"शालेय स्वराज्य–मंत्र आणि तंत्र" दि. ८-१०-५९
श्री. मु. ना. कागलकर, अमरावती	"शिक्षणात धर्माचे स्थान" दि. ९-१०-५९

दि. १८-११-५९ ला वि. सा. संघ व कलाविकास मंडळ यांचे वतीने प्रा. ना. सी. फडके यांचे "ललित साहित्याचा हेतु व प्रतिज्ञा" या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी जिल्हाधीश श्री. सुरडकर हे होते. याप्रसंगी प्रा. वनमाली व श्री. मशानकर यांचीहि भाषणें झाली.

गोंदिया शाखा--

गोंदिया शाखेचे भरीव कार्य-- वि. सा. संघाच्या गोंदिया शाखेच्या विद्यमाने मंगळवार दि. १५-३-६० रोजी सायंकाळी ५-१५ वाजता सागरचे

उद्योगपति श्रीमान चिंतामणराव पिंपळापुरे यांचे हस्ते भवभूतिं–स्मारकांतर्गत रंगमंदिराचा कोनशिला समारंभ अत्यंत थाटाने करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन गोंदिया येथील उद्योगपति श्री. मनोहरभाई पटेल यांनी देणगी म्हणून दिलेल्या वि. सा. संघाच्या जागेत भव्य शामियाना उभारून करण्यात आले होते.

ह्या प्रसंगी श्रीमान् चिंतामणराव पिंपळापुरे, वि. सा. संघाचे संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे व युगवाणीचे संपादक श्री. पु. य. देशपांडे, व श्री. ना. ह. तेलंग यांची भाषणे झाली. ह्या कार्यासाठी मुंबई शासनाने पंचवीस हजार रुपयाचे अनुदान देण्याचे आश्वासन दिले असून व त्या अनुदानापैकी पहिला हप्ता कार्यक्रमाचे दिवशीच मिळाल्याचे जाहीर करण्यात आले.

ह्या समारंभाचे निमित्ताने गोंदिया शाखेचे अध्यक्ष श्रीमान छोटुसाभाई क्षत्रिय यांनी सन्माननीय पाहुणे व इतर गोंदिया निवासी कार्यकर्ते यांना उत्कृष्ट मेजवानी दिली.

अकोला शाखा– अकोला येथे वि. सा. संघाची शाखा स्थापन करण्यात आली. या शाखेच्या वतीने दि. १५–११–१९५९ रोजी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे शाखा पदाधिकारी संमेलन भरविण्यात आले. या संमेलनाकरिता सर्व शाखांचे मिळून १९ प्रतिनिधि उपस्थित होते.

सकाळी ८–३० वाजता संमेलनाला सुरुवात होऊन सर्व शाखांच्या प्रतिनिधींनी आपापल्या शाखेचा वार्षिक अहवाल सादर केला. परस्पर विचार विनिमय झाल्यावर पहिली सभा संपली

शाखा पदाधिकारी संमेलनाच्या प्रतिनिधींची दुसरी सभा दुपारी ४-३० वा. आमदार श्री. मधुसूदन वैराळे यांचे निवासस्थानी भरली. यावेळी अनौपचारिक-पणे विचार विनिमय होऊन केंद्रीय कार्यालय आणि इतर शाखा यांच्या कार्य-वृद्धीच्या दृष्टीने विचार करण्यात आला.

रात्रौ ९–३० वाजता नाट्यकला मंदिर, अकोला या संस्थेने “पैसे झाडाला लागतात” ह्या नाटकाचा प्रयोग सादर केला. संमेलन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. अनिल मराठे, श्री. शांताराम जैन, आमदार मधुसूदन वैराळे, श्री. प्र. ना. खोडे आणि इतर सदस्य यांनी फार परिश्रम घेतले.

अनुक्रमणिका

२२ वे विदर्भ साहित्य सम्मेलन (सावरगाव डुकरे)

शनिवार दि. १३ व १४ फेब्रुवारी १९६० रोजी वि. सा. संघाचे २२ वे साहित्य संमेलन सावरगाव डुकरे या आदर्श गावी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली अत्यंत यशस्वीपणे पार पडले. सुरुवातीला दि. १३–२–६० ला दुपारी ३ वा. ऐतिहासिक, साहित्यिक व कलात्मक प्रदर्शनाचे उद्घाटन श्री. शं. गो. डवीर यांनी केले. हे प्रदर्शन भरविण्यासाठी राजाराम वाचनालय, चित्रकार श्री. मनोहर, छायाचित्रकार श्री. मधु पारळकर, श्री. अ. ल. लिमये, श्री. म. वि. पंडे, श्री. श्री. स. काळे, श्री. वसंत खेडीकर व सेन्ट्रल लायब्ररी नागपूर यांचे बहुमोल साहाय्य झाले. संमेलनाचे उद्घाटन दि. १३–२–६० रोजी सायंकाळी ५ वाजता मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते झाले. यानंतर रीतसर अध्यक्षांची निवड झाल्यावर संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी आपले अध्यक्षीय भाषण वाचून दाखविले. वंदेमातरम् झाल्यावर पहिल्या दिवशीचा महत्वाचा कार्यक्रम संपला.

रात्री ९–१५ वाजता अधिवेशनाच्या मंडपात श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली कवि संमेलन झाले. यात पुढील कवींनी भाग घेतला–संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, श्री. पद्माकर डावरे, श्री. बाबा मोहोड, श्री. मधु पारळकर, कु. दुर्गा कानगो, श्री. व्यं. व. पुराणिक, श्री. कृ. मु. उजळंवकर, श्री. वि. वा. जोशी, श्री. रा. ना. पांडे, श्री. प्रभाकर उघडे, श्री. वा. के. अत्रे, कु. सुगंधा शेंडे, श्री. भी. रा. जहागिरदार, श्री. भाऊ मांडवकर, श्री. शे. सु. जैन, श्री. न. रा. निमजे, श्री. द. ज. वर्गी, श्री. भालेराव, श्री. दा. ल. अडोणी, श्री. जा. गो. खडसे, श्री. ग. श. मोरे, व श्री. रा. रा. सीताफळे.

पुस्तक प्रकाशन––

रविवार दि. १४–२–६० रोजी सकाळी ९ वाजता प्रा. पद्माकर डावरे लिखित "नाना फडणवीस ! दादा ! भाई ! नवरोजी !!" ह्या एकांकिका संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

बोलीभाषांवर परिसंवाद––

सकाळी ९–३० वाजता "मराठी व तिच्या वैदर्भीय बोलभाषा" ह्या विषयावर परिसंवाद झाला. वऱ्हाडी, गोंडी, कोरकू, हळबी, इ. उपेक्षित बोलभाषांच्या अध्ययनाला चालना देण्याचे दृष्टीने फार मोठे कार्य ह्या परिसंवादाने घडवून आणले. यात श्री. सोमण वकील बुलढाणा, यांचे वऱ्हाडीबद्दल; प्रा. सुरेश डोळके

नागपूर, यांचे नागपुरी व हळवी भाषांबद्दल; श्री. वि. वा. जोशी चांदा, यांचे गोंडी भाषेबद्दल; श्री. द. बा. प्रधान शिक्षणाधिकारी अमरावती यांचे कोरकू भाषेवर; प्रा. दा. ल. अडोणी सागर, यांचे बुंदेलखंडीवर व प्रा. जहागीरदार खामगाव, यांचे अहिराणी भाषेवर अशी विद्वत्तापूर्ण भाषणे झाली. ह्याशिवाय प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे यांनी 'भाषा व बोली' ह्या विषयावर व पुलगावचे डॉ. द. ह. अग्निहोत्री यांनी 'बोलभाषांचे व्युत्पत्तिशास्त्र' यावर उद्बोधक भाषणे केली. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनीहि ह्या परिसंवादात भाग घेतला व वैदर्भीय व कोकणी बोली यातील काही साम्ये दर्शविणारे व्यासंगपूण भाषण केले.

विषय नियामक सभा––

दुपारी १ वाजता विषय नियामक समितीची सभा भरली. यात खुल्या अधिवेशनात मांडावयाचे ठराव व त्यावर बोलणाऱ्या वक्त्यांची नावे निश्चित करण्यात आली.

साधारण सभा––

दुपारी २ वाजता साधारण सभा भरली. यात मागील सभेचा अहवाल वाचून दाखविण्यात आला व अनुपूरक अंदाज पत्रकाला मान्यता देण्यात आली.

माननीय ज्येष्ठांचा सत्कार––

सायंकाळी विदर्भातील काही वयोवृद्ध, ध्येयनिष्ठ व त्यागी कार्यकर्त्यांचा सत्कार अत्यंत रोचक व भावपूर्ण असा झाला. प्रा. श्री. गो. काशीकर यांनी प्रास्ताविक भाषण करून सत्काराचा हेतु व स्वरूप स्पष्ट केले. या सत्कारात श्री. पन्नालालजी व्यास खामगाव, श्री. पंढरीनाथ पाटील, चिखली, श्री. शं. गो. डवीर वाशीम, श्री. मा. ज. कानेटकर नागपूर श्री. म. सी. मुंडले, मोर्शी यांना श्रीफल व शाल संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे हस्ते देण्यात आली.

खुले अधिवेशन––

या खुल्या अधिवेशनात एकूण ११ महत्वाचे ठराव मंजूर करण्यात आले.

ठरावाचे विषय––

ठराव–– (१) दिवंगत साहित्यिकांना श्रद्धांजलि (२) मराठी शुद्धलेखनाबाबत. (३) गावांची नावे बदलणे. (४) सांस्कृतिक व्यासपीठाची कल्पना.

अनुक्रमणिका

(५) महाकवि भवभूति, मराठीचे आद्यकवि मुकुंदराज यांचे स्मारक उभारण्याबावत (६) मुंबई सरकारने शासन साहित्य परिषद सुरू करण्याबाबत (७) पुराणवस्तुखात्याचे कार्यालय विदर्भ प्रदेशात सुरू करण्यावावत विनंती. (८) ग्रंथालयविषयक कायदा. (९) राज्यपुनर्रचनेचेवेळी मराठीभाषी विभाग मुंबई राज्यात एकत्रित न केले गेलेले कांही प्रदेश समाविष्ट करण्यावावत सरकारला विनंती. (१०) विदर्भाकरिता लोकसाहित्य समिति स्थापन करणे. (११) कै. राम गणेश गडकरी यांचे स्मारक सावनेर येथे करण्याबाबत व त्यांचे घर ताब्यात घेण्यावावत मुंबई शासनास विनंती. ह्या ठरावावर प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, प्रा. सुरेश म. डोळके, डॉ. द. ह. अग्निहोत्री, श्री. य. गो. मालोदे, प्रा. दा. ल. अडोणी, श्री. वा. पू. मोहरीर, प्रा. भा. ल. भांबूरकर, श्री. अ. ल. लिमये, श्री. बाळासाहेब हवळे, श्री. संतोषराव पाटील, श्री. यादवराव उपाध्ये, व श्री. गो. स. देहाडराय यांनी भाषणे केली.

नाटचप्रयोग--

रात्री ९-३० वाजता चिखली येथे नगरपालिका विद्यालयाचे प्रांगणात वि. सा. संघाच्या खामगाव शाखेच्या वतीने श्री. पु. ल. देशपांडे लिखित "भाग्यवान" नाटकाचा प्रयोग करून दाखविला.

अनुदान व देणग्या-

१. मुंबई शासन-वार्षिक अनुदान रु. ७५००-००

२. मुंबई शासनाकडून यंदा नाटचसमितिकरिता रु. ३०००-०० चे अनुदान मिळाले.

३. सावरगावडुकरे संमेलनाकरिता शिक्षणविभागाकडून ५०० रु. चे अनुदान मिळाले.

४. श्री. कार्यवाह, महाराष्ट्र हितकारी मंडळ, जमशेटपूर यांनी कै. नानाजोग स्मारक निधीसाठी १५१-०० रु. ची देणगी दिली.

५. श्री. बाबुराव चिमोटे, नागपूर यांनी वि. सा. संघाच्या नाटचसमितीला १३०-०० रु. ची देणगी दिली.

वि. सा. संघ वरील सर्व देणगीदारांचा अत्यंत आभारी आहे.

धनवटे रंगमंदिर–विदर्भ साहित्य संघ
१९५९–६०

रंगमंदिरात १९५९ ते ६० (एप्रिल ते मार्च) या दरम्यान खालील प्रमाणे कार्यक्रम झालेत.

संगीत–नृत्य	–	४९	कार्यक्रम
मराठी नाटके	–	६९	
हिंदी	–	१२	
गुजराती	–	२	
इतर भाषांचे कार्यक्रम नाटके व संगीत		१०	
सभा सम्मेलन व व्याख्याने इ.		४२	

भाडयापोटी रंगमंदिरास चालूवर्षी एकूण उत्पन्न ३५६५९ रु. झाले. अहवालाचे साली रंगमंदिर समितीच्या एकूण १० सभा घेण्यात आल्या. रंग मंदिराचे हिशेब १९५९–६० चे तपासले गेले असून जमाखर्चाचे तक्ते तयार आहेत.

आभार––या वर्षी वि. सा. संघाचे कार्य पार पाडण्यास अनेक कार्यकर्त्यांचे, दात्यांचे, सभासदांचे व संस्थांचे साहाय्य झाले आहे. वि. सा. संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे. वि. सा. संघाला यापुढेहि सर्वांचे साहाय्य लाभावे ही प्रार्थना आहे.

ना. रा. शेंडे,
अध्यक्ष
विदर्भ साहित्य संघ

श्री. गो. काशीकर,
सरचिटणीस,
थ. गो. मालोदे,
भा. ल. भांबूरकर,
चिटणीस,
वि. सा. संघ.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर. ३१ मार्च १९६० रोजी असलेला आढावा (बॅलन्सशीट)

फंड व लायबिलीटीज

	रुपये न.पै.	रुपये न.पै.
मंदिर निधी		
मागील बाकी	१,६१,५८९–११	
अधिक मागील वर्षापैकी राहिलेले	२४,१९७–१३	
	१८५,७८६–२४	
अधिक यंदाचे	१७००१–००	२,०२,७८७–२४
सरकारी अनुदान		
मागील बाकी	२,०५,३३३–००	
अधिक यंदाचे	३६,६४०–००	२,४१,९७३–००
फिक्सड् डिपॉझिट		
मागील बाकी	४२,५००–००	
वजा मागील वर्षाचे राहिलेले	५,०००–००	
	३७५००–००	
वजा चालू साली परत केले	२०,५००–००	१७,०००–००
आजीव सभासद		
मागील बाकी	६,५७२–००	
अधिक यंदाचे	८५६–००	७,४२८–००
कै. बेहरे व्याख्यानमाला		६०००–००
श्री गणेश व्याख्यान माला		६०००–००
कै. नेने स्मारक फंड मागील बाकी		७५–००
पुढे चालू		४,८१,२६३–२४

ॲसेटस् व प्रॉपर्टी

	रुपये न.पै.	रुपये न.पै.
मंदिर रचना		
मागील बाकी	४,२२,८५१–७५	
अधिक मागील वर्षापैकी राहिलेले	३६,१३८–०४	
	४,५८,९८९–७९	
अधिक यंदाचे	७२,१५०–३७	
		५,३१,१४०–१६
फर्निचर व इतर सामान		
मागील बाकी	८,७३६–१०	
अधिक यंदाचे	२८८–६५	९०२४–७५
टिनशेड व विहीर		
मागील बाकी		५३४१–८६
पुस्तके (गडकरी ग्रंथालय)		
मागील बाकी	१,२३०–३९	
अधिक यंदाचे	३२०–४८	१,५५०–८७
इलेट्रिक डिपॉझिट		
मागील बाकी	३३१–००	
टेलिफोन डिपॉझिट यंदाचे	१००–००	४३१–००
पुढे चालू		५,४७,४८८–६४

तात्पुरतं कर्ज–		
चालू सालचे		२,७५९–५०
व्यापारी देणे (इमारतीच्या कामानिमित्त)		
१९५८–१९६० चे देणे	३२,०४५–७३	
वजा १९५९–१९६०मध्ये दिले	२१,२८१–९६	
	१०७६३–७७	
अधिक चालू सालचे देणे	३८,१४३–६५	४८,९०७–४२
अनामत मागील	६,५००–००	
चालू साली परत	६,५००–००	०–००
सस्पेन्स अकौंट		
मागील बाकी	१८३–६६	
अधिक यंदाचे	७८७–५०	
		९७१–१६
बॅंक ओव्हर ड्राफ्ट		
(दि बॅंक ऑफ महाराष्ट्र बिल्डिंग फंड)		५५१–५८
जनरल फंड		
मागील बाकी	४५,०८२–१८	
वजा उत्पन्नापेक्षा खर्च अधिक	३३७–२६	
		४४,७४४–९२
		५,७९,१९७–८२

मागील पानावरून		५,४७,४८८–६४
ॲडव्हान्स टू स्टाफ		
मागील बाकी	७५–२०	
अधिक यंदाचे	२४–८०	१००–००
ॲडव्हास इमारतीच्या कामानिमित्त		५,३६०–९६
गडकरी तैल चित्र		
मागील बाकी		३००–००
मुदती ठेव		
मागील बाकी	७,०००–००	
अधिक यंदाचे	६,०००–००	१३,०००–००
शिल्लक		
शिल्लक जवळ	१११–८९	
सरकारी अनुदान रोख	७,०००–००	
नाट्य समिति	२००–००	
परीक्षा समिति ५४२–६८ } ३११–४५ }	८५४–१३	
दि बॅंक ऑफ महाराष्ट्र (करंट)	२७५–६२	
विदर्भ प्री. को-ऑ-हाऊसिंग सोसायटी	४,२४५–०४	
रंगमंदिर शिल्लक	२६१–५४	१२,९४८–२२
		५,७९,१९७–८२

प्रमाण पत्र—विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या ३१ मार्च १९६० रोजी तयार असलेल्या बॅलन्स-शीटमध्ये वर दिलेले आकडे संघाच्या जमाखर्चाच्या पुस्तकाशी तंतोतंत जुळतात आणि ही पुस्तके आम्ही तपासली असून ती बरोबर आहेत असे प्रमाणपत्र आम्ही देतो. रंगमंदिरासंबंधीचे हिशेब १९५८–५९ व १९५९–६० चे तयार झालेले चालू साली हाती आल्यावरून वरील तक्ता आता सुधारून घेतला आहे.

महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकाऊंटंटस्

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

(१-४-१९५९ ते ३१-३-१९६०) ३१ मार्च १९६० ला संपणाऱ्या वर्षाच्या आय-व्ययाचा तक्ता

आय	रुपये न. पै.	व्यय	रुपये न. पै.
साधारण सभासद वर्गणी	२,४८२-००	वेतन खर्च	४,२९१-२२
परीक्षा शुल्क	२,७०८-७२	पोस्टेज	२८८-९९
किरकोळ जमा	१,०१३-६९	फोन	६१२-४०
सांस्कृतिक कार्यक्रम समिति	१३,०९६-२५	मुद्रण व स्टेशनरी	९३१-४२
नाट्य समिति	१,१७६-५०	युगवाणी मुद्रण	४,४५९-६३
नाट्य स्पर्धा	३७-१९	वाहन व प्रवास खर्च	७६८-४७
पुस्तक विक्री	११५-५१	किरकोळ खर्च	२६३-०१
ठेवीवरील व्याज	४५९-३८	सांस्कृतिक कार्यक्रम समिति	९००२-६१
युगवाणी वर्गणी	१०५-००	गडकरी स्मारक समिति	३७९-०५
पुढे चालू	२१,१९४-२४	पुढे चालू	२०,९९४-८०

अनुक्रमणिका

मागील पानावरून	२१,१९४–२४
सरकारी अनुदान	७५,००–००
गडकरी स्मारक समिति	१३६–५०
कै. रानडे वाद स्पर्धा	९०–०१
उत्पन्नापेक्षा जास्त खर्च	३३७–२६
	२९,२५८–०१

मागील पानावरून	२०,९९४–८०
नाटय समिति	१०१४–६२
आतिथ्य	२५४–१३
परीक्षा समिति	४,१९१–१८
कार्यालयीन व्यवस्था व शाखासाहाय्य	१,२०८–९३
संमेलन	४९५–४२
वीज खर्च	५४३–०३
ग्रंथ संपादन व संशोधन	२०९–६०
बँक कमिशन	१५–२०
अंशदान	२७९–१०
ऑडिट फी	५०–००
	२९,२५८–०१

तपासले व ते बरोबर आहेत

महेश्वर जनार्दन गद्रे

चार्टर्ड अकाऊंटंटस्

विदर्भ साहित्य संघ, नागपूर १९५९–६०

तपशील	आय	तपशील	व्यय
आरंभीची शिल्लक:–	रुपये न.पै.		रुपये न. पै.
शिल्लक जवळ	१०९–१५	वेतन खर्च	४,२९१–२२
,, चेक	१००–००	पोस्टेज	२८८–९९
दि बँक ऑफ महाराष्ट्र (करंट)	६३६–१४	मुद्रण व स्टेशनरी	९३१–४२
,, (बिल्डिंगफंड)	२,३६६–२८	युगवाणी मुद्रण	४,४५९–६३
विदर्भ प्री-को-ऑ-हा. सोसायटी	३,११४–४०	किरकोळ खर्च	२६३–०१
नाटय समिति	२००–००	सांस्कृतिक कार्यक्रम समिति	९,००२–६१
परीक्षा समिति (श्री सगदेव)	५४२–६८	गडकरी स्मारक समिति	३७९–०५
मुदती ठेव	७०००–००	नाटय समिति	१,०१४–६२
सरकारी अनुदान	७५००–००	आतिथ्य	२५४–१३
	२१,५६८–६५	वीज खर्च	५४३–०३
साधारण सभासद वर्गणी	२,४८२–००	परीक्षा समिति	४,१९१–१८
आजीव सभासद वर्गणी	८५६–००	कार्यालयीन व्यवस्था व शाखासाहाय्य	१,२०८–९३
पुस्तक विक्री	११५–५१	वस्तु खरेदी	२८८–६५
पुढे चालू	२५०२२–१६	पुढे चालू	२७,११६–४७

अनुक्रमणिका

मागील पानावरून	२५,०२२–१६	मागील पानावरून	२७,११६–४७
व्याज	४५९–३८	ग्रंथ संपादन व संशोधन	२०९–६०
परीक्षा शुल्क	२,७०८–७२	अंशदान	२७९–१०
सांकृतिक कार्यक्रम समिति	१३,०९६–२५	गडकरी ग्रंथालय	३२०–४८
सरकारी अनुदान	७,५००–००	ऑडिट फी	५०–००
किरकोळ उत्पन्न	१,०१३–६९	वँक कमिशन	१५–२०
नाटय समिति	१,१७६–५०	अॅडव्हान्स टू स्टाफ	२४–८०
नाटय स्पर्धा	३७–१९	साहित्य मंदिर बांधकाम	९८८–००
गडकरी स्मारक समिति	१३६–५०	संमेलन	४९५–४२
सस्पेन्स आकौंट	७८७–५०	मंदिर रचना–तात्पुरते कर्ज (जुने४९००।-नवे१४०००।-)	१४,०००–००
युगवाणी वर्गणी	१०५–००	फोन खर्च	६१२–४०
कै. वेहरे व्याख्यान माला	६,०००–००	टेलिफोन डिपॉझिट	१००–००
श्रीगणेश व्याख्यान माला	६,०००–००	वाहन व प्रवास खर्च	७६८–४७
मंदिर रचना–तात्पुरते कर्ज (जुने ४९००।-नवे ४०००।-)	८,९००–००	फिक्सड् डिपॉझिट परत	२०,५००–००
कै. रानडे वाद स्पर्धा	९०–०१		

अनुक्रमणिका

रंगमंदिर		मंदिर रचना	३४,३७९–६८	
शिल्लक जवळ	४४–९५	,, चालू सालातील देणे असलेली देयके	३८,१४३–६५	
देणग्या, भाडे, व्याज इत्यादि	५२,७८४–४९			७२,५२३–३३
सरकारी अनुदान	३६,६४०–००	,, मागील वर्षाच्या देण्यापोटी		२१,२८१–९६
		,, अॅडव्हान्स		२,०००–००
तात्पुरते कर्ज	१६,८६९–५०	दिलेले व्याज	३५८–४३	
चालू सालातील देणे असलेली देयके	३८,१४३–६५	देखरेख	७,९४७–५०	
ओव्हर ड्रॉन चेक्स	५५१–५८	तात्पुरते कर्ज परत	९,०१०–००	
		वीज	४,७०९–९४	
		किरकोळ खर्च	२४४–९७	
		कारपोरेशन टॅक्सेस	५५६–००	
		प्रिमियम	९६२–२४	
		नाट्यमहोत्सव	८०–००	
		पोस्टेज	२६–४३	
पुढे चालू	२,१८,०६७–०७	ढे चालू	२३,८९५–५१	१,६१,२८५–२३

मागील पानावरून	२५,०२२–१६	मागील पानावरून		२७,११६–४७
व्याज	४५९–३८	ग्रंथ संपादन व संशोधन		२०९–६०
परीक्षा शुल्क	२,७०८–७२	अंशदान		
				२७९–१०

मागील पानावरून	२,१८,०६७–०७	मागील पानावरून	२३८९५–५१	१,६१,२८५–२३
		टेलिफोन	२६०–७५	
		स्टेशनरी,	४३–५९	
		छपाई	१३३–७७	
		क्ष परत	६,५००–००	३०,८३३–६२
		शिल्लक जवळ	१११–८९	
		सरकारी अनुदान रोख	७,०००–००	
		नाट्यसमिति	२००–००	
		परीक्षासमिति (श्री सगदेव)	५४२–६८	
		(प्रा-गेडाम)	३११–४५	
		दि बँक ऑफ महाराष्ट्र (करंट)	२७५–६२	
		विदर्भ प्री-को-ऑ-हा-सो.	४,२४५–०४	
		मुदती ठेव	१,३,०००–००	
		रंगमंदिर शिल्लक	२६१–५४	२५,९४८–२२
	२,१८,०६७–०७			२,१८,०६७–०७

तपासले. बरोबर आहे

महेश्वर जनार्दन गद्रे

चार्टर्ड अकाऊंटंटस्

नागपूर दि. २३ एप्रिल १९६०

विदर्भ साहित्य संघ

विनंती

ज्या सभासदांनी आपला 'युगवाणी' मासिकाचा अंक पुढे चालू ठेवावा असे कळविले आहे त्यांना जुलै १९६० पर्यंतचे अंक पाठविले आहेत. ही सवलत ऑगस्ट १९६० पासून रद्द करण्यात येणार आहे. तरी ज्यांनी अद्याप वर्गणी पाठविली नसेल त्यांनी त्वरित पाठविण्याची कृपा करावी. प्रचारकांनी काही सभासदांची यादी पाठवून अंक चालू ठेवण्याविषयी कळविले आहे. त्यांनी दि. १५ जुलै १९६० पर्यंत त्या सभासदांची वर्गणी व पावत्यांचा दुसरा भाग केंद्रीय कार्यालयात पाठवावा ही विनंती आहे. वर्गणी आल्यावर ऑगस्ट १९६० पासून युगवाणीचे अंक पूर्ववत पाठविता येतील.

शाखाधिकारी व निरनिराळ्या ठिकाणचे प्रचारक यांना असे सुचविण्यात येते की, त्यांचेकडे आतापर्यंत वि. सा. संघाकडून दिलेल्या पावतीपुस्तकांपैकी जी पावतीपुस्तके पूर्ण संपली असतील किंवा ज्या पावतीपुस्तकांचा उपयोग होत नसेल ती सर्व पावती पुस्तके कार्यालयात पाठविण्याची कृपा करावी. तसेच सभासद नोंदणी केल्यावर प्रत्येक महिन्याच्या दिनांक १५ पर्यंत पावतीचा अगर पावत्यांचा मधला भाग वर्गणीसह केंद्रीय कार्यालयाकडे पाठवावा अशी विनंती आहे.

नवीन सभासदांकडे युगवाणीचे अंक पाठविता यावेत ह्या दृष्टीने वरील प्रकारची कार्यवाही आवश्यक आहे.

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस वि. सा. संघ

विदर्भ साहित्य संघ

नवीन सभासद होऊ इच्छिणारास सूचना

विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९६० पासून सुरू झाले असून नवीन वर्षाकरिता सभासद नोंदणी सुरू झाली आहे. वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठीभाषीप्रेमी व्यक्तीला सभासद होता येते. नव्याने सभासद होणारांना आवेदनपत्र भरून द्यावे लागते. साधारण सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त रु. ३ आहे. सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यात येतात. सभासदांचे वर्ग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **उपकर्ते**—पाच हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(आ) **आश्रयदाते**--एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(इ) **सहाय्यक**--पाचशे किंवा अधिक रुपये देणारे.

(ई) **हितचिंतक**--अडीचशे किंवा अधिक रुपये देणारे.

(उ) **आजीव सभासद**--पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.

(ऊ) **साधारण सभासद**--वार्षिक तीन रुपये देणारे.

मराठी भाषेबद्दल प्रेम असणाऱ्या जास्तीत जास्त व्यक्तींनी सभासद व्हावे. आवेदनपत्र व वर्गणी केंद्रीय कार्यालयाकडे किंवा अधिकृत कार्यकर्त्याकडे जमा करावी व पावती घ्यावी ही विनंती.

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

हे मासिक श्री. **पुरुषोत्तम दिवाकर ढवळे**, यांनी वि. सा. संघाकरिता प्रदीप मुद्रणालय, धरमपेठ, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीतावर्डी, नागपूर १ काशित केले.